

स्थापना १९६७

श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा द्वारा संचालित

# श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

देऊळगाव राजा, जि. बुलडाणा - ४४३२०४

Web : www.svcdraja.org    E-mail : svcollege3@rediffmail.com

■ Uni. College Code - 309 ■ NAAC Re-accredited at 'B' Level ■ UGC Recog. 2(F) & 12(B)




# माहिती पुस्तिका

# PROSPECTUS

(2023-24)

## प्रेरणा स्थान



# मा. राजे विजयसिंह जाधव

(B.E.Mech.,DEM)

वंशपारंपरिक विश्वस्त, श्री बालाजी महाराज संस्थान, देऊळगाव राजा तथा
अध्यक्ष, श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगाव राजा.




महाविद्यालयाचे प्रवेशद्वार




कला व वाणिज्य विद्याशाखेची इमारत



प्रशासकीय इमारत



विज्ञान विद्याशाखेची इमारत



संगणक प्रयोगशाळा



विज्ञान विद्याशाखेतील प्रयोगशाळा

Est. 1967

## VISION

Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja aims at transforming students' lives through inclusive quality education and by equipping students with knowledge and skills in their chosen stream, inculcate values, identify hidden talents, provide opportunities for students to realize their full potential and thus shape them into future leaders, educationists, entrepreneurs, self reliant persons and above all good human beings.

## MISSION

1) To provide the standard infrastructure and educational facilities to the students with minimum cost.
2) Strive continually to innovate and find new and more effective ways to educate students and serve the community.
3) Focus on participatory learning & skill development and impart career oriented and business oriented education.
4) Nurture discipline among students and imbibe the novel knowledge and artistic expressions in them in response to a rapidly changing world.
5) To educate students for their personality development and develop them intellectually, physically and emotionally.
6) Sustain rigor in our work holding high standards and expectations for both our students and for ourselves.
7) Keep positive approach towards work and work with compassion, integrity, love and care.
8) To inculcate a strong belief in hard work and core values of gender equality, human rights and ecology in order to make them socially responsible citizens.
9) To work to inculcate high moral and ethical values amongst the students to make them good human beings.

# विद्यार्थ्यांशी हितगूज...

प्रिय विद्यार्थी मित्रांनो !

शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये यश संपादन केल्याबद्दल आपले अभिनंदन! या स्पर्धामय युगामध्ये यशोशिखराकडे मार्गक्रमण करताना काही बाबींचे कसोशीने पालन करावे लागते. यश हे बहुअंशी आपण घेतलेल्या निर्णयाच्या अचूकतेवरही अवलंबून असते. संस्थापक अध्यक्ष कै.राजे राजेंद्रसिंहजी जाधव यांच्या डोळस कर्तव्यदक्षतेतून १९६७ साली स्थापन झालेले श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय स्थापनेपासूनच विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रवेशाच्या निर्णयाला सार्थ ठरवित आले आहे. श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व महाविद्यालयाचे विद्यमान अध्यक्ष मा. राजे विजयसिंहजी जाधव यांचे भक्कम असे कल्पक मार्गदर्शन सातत्याने महाविद्यालयाचे शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल करणारे ठरले आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेत कु. वैष्णवी शिंदे (२०२१) या विद्यार्थीनीने कला शाखेतून राज्यशास्त्र विषयात सुवर्णपदक पटकावले. या अगोदर कु.सरला डोईफोडे (२०१०), कु. अश्विनी साळवे (२०१८), कु. कोमल झोरे (२०२०) यांनी राज्यशास्त्र विषयात व रवी खिल्लारे (२०१२) या विद्यार्थ्याने इतिहास विषयात सुवर्णपदक पटकावले. तसेच कु. रोहिणी दोडके (२०१९) या विद्यार्थीनीने एम.ए. मराठी मध्ये मेरीट यादीत स्थान पटकावले. मराठी विभागप्रमुख प्रा.मधुकर जाधव यांना अध्यापनासाठी राज्यस्तरीय सेवागौरव पुरस्कार मिळाला. या बाबी महाविद्यालयाचा नावलौकीक वाढविणाऱ्या ठरल्या आहेत.

इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. १२ वी वाणिज्य शाखेचा निकाल १००% लागला असून कला शाखेचा निकाल ९३.००% लागला आहे. वाणिज्य शाखेत कु. मोहिनी महाजन हिने ७४.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. ७४.१७% गुण मिळवून सारंग पुजारी या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे आणि ७१.५०% गुण मिळवून वैभव मघाडे याने तृतिय क्रमांक पटकावला आहे. कला शाखेत ६७.००% गुण मिळवून कु. स्नेहा पाखरे हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. ६५.००% गुण मिळवून मंगेश शिंगणे याने द्वितीय आणि ६४.००% गुण मिळवून चेतन बुरकुल या विद्यार्थ्याने तृतिय क्रमांक पटकावला आहे. या उत्कृष्ट निकालावरुन महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखल्याचे लक्षात येते.

**महाविद्यालयाच्या पर्यावरण संतुलनविषयक उपक्रमाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने विद्यापीठस्तरीय पर्यावरण पुरस्कार देऊन महाविद्यालयास सन्मानित केले.** महाविद्यालयामध्ये एन.एस.एस. विभाग सक्रीय असून या विभागास संगाबाअवि,अमरावती चा उत्कृष्ट रा.से.यो. एकक व उत्कृष्ट रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी पुरस्कार यासह अनेक वेळा विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय स्वच्छ भारत अभियान पुरस्कार प्राप्त झाला आहे, ही गौरवाची बाब आहे. तसेच कु. शितल जमधडे (२०१५) हिने मुंबई येथे पथसंचालनात सहभाग नोंदवला. रा.से.यो. पथकामध्ये सहभागी स्वयंसेवकांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्वयंसेवकास रा.से.यो. विभागाच्या वतीने विविध शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते.

विद्यार्थ्यांसाठी १३ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. खामगाव अंतर्गत राष्ट्रीय छात्र सेनेचे कायम युनिट महाविद्यालयामध्ये सक्षमपणे कार्यरत आहे. एन.सी.सी. मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना 'बी'

सर्टिफिकेट व 'सी' सर्टिफिकेट परीक्षेच्या माध्यमातून आर्मी व पोलीस दलामध्ये नोकरी प्राप्त करता येते तसेच एनसीसी कॅडेट्सना एटीसी कॅम्प, आरडीसी कॅम्प, टीएससी व एनआयसी कॅम्पमध्ये सहभागी होता येते. अक्षय पाखरे व आरती पवार (२०१५), अजय कासारे (२०१६), शुभम बोर्डे (२०१८) या कॅडेट्सनी दिल्ली येथे आर. डी. कॅम्पमध्ये पंतप्रधान रॅली पथसंचलनामध्ये सहभाग नोंदविला. अविनाश खरात (२०१५), अजय घुगे (२०१८) व ओम कंकाळ (२०१९) या कॅडेट्सनी नवी दिल्ली येथे आयोजित ऑल इंडिया थल सैनिक कॅम्पमध्ये सहभागी होऊन महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. एनसीसी कॅडेट कु. सरला घोंगे हिने (२०१५) राष्ट्रीय स्तरावरील खो-खो स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. या बाबी नक्कीच महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणाऱ्या ठरल्या आहेत.

क्रीडा क्षेत्रामध्ये वरिष्ठ महाविद्यालयाच्या शैलेश बेनिवाले व सौरभ राऊत या कुस्तीपटूंनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले आणि कलरकोट प्राप्त केला. सौरभ राऊत या विद्यार्थ्याने २०२१ मध्येही चौधरी बन्सीलाल युनिव्हर्सिटी, हरियाणा येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करून कलरकोट प्राप्त केला होता. या अगोदर ज्ञानदेव जगताप (२०११, २०१३), उत्तम वीर (२०१८), भरत काळे (२०१९), कृष्णा शेळके (२०१९), भूषण काळे (२०२०) या कुस्तीपटूंनीसुध्दा कलरकोट प्राप्त केला, अमोल मोकाशे (२०१५) या विद्यार्थ्याने आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टींग स्पर्धेमध्ये कांस्य पदक पटकावले. महाविद्यालयासाठी ही नक्कीच आनंदाची बाब आहे.

सांस्कृतिक विभागामध्ये कु. साक्षी वाघ(२०२१) हिने आंतरराष्ट्रीय कथा लेखन पुरस्कार पटकावला, अविनाश तळेकर (२०१९, २०२०, २०२१) याने राज्यस्तरीय मृदंग वादन स्पर्धेत सलग तीन वेळा सहभाग नोंदवला.

महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन विभाग कार्यरत असून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. आदी स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन केले जाते. भरघोस उपक्रमांच्या माध्यमातून नवप्रवेशितांना स्पर्धा परीक्षांचा परिचय तर अभ्यासकांना दिशादर्शक मार्गदर्शन दि. युनिक अकॅडमी, पुणे, स्टडी सर्कल, औरंगाबाद, दीपस्तंभ अकॅडमी, जळगाव यासारख्या नामवंत संस्थांच्या माध्यमातून केले जाते.

महाविद्यालयामध्ये भव्य क्रीडा संकूल, विपूल ग्रंथसंपदा असलेले सुसज्ज व अद्ययावत ग्रंथालय, सर्व तांत्रिक सुविधांनी युक्त असे दोन सांस्कृतिक सभागृह, बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. महाविद्यालयामध्ये युजीसी मान्यताप्राप्त व केंद्र शासनाच्या HRD मंत्रालय व Ministry for SkillDevelopment द्वारा मंजूर व पुरस्कृत तसेच संगाबाअवि, अमरावती संलग्रित B.Voc. (Agriculture Science) हा तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरू आहे. तसेच एस.सी, एस टी., ओ.बी.सी. कॅटेगिरीच्या विद्यार्थ्यांसाठी रेमेडियल कोचिंग तसेच करिअर आणि कौन्सिलिंग सेल आदी योजना सुरू आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी 'स्पंदन' वार्षिकांक देखील प्रकाशित केला जातो.

श्री व्यंकटेश महाविद्यालयाला संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी ज्ञानदानाची प्रदीर्घ परंपरा लाभलेली आहे. गत ५६ वर्षांपासून महाविद्यालयातून ज्ञानरूपी पंखांच्या साह्याने असंख्य विद्यार्थी गगनाला गवसणी घालण्यात यशस्वी ठरले आहेत. आपण या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा संधीचे सोने करण्याची क्षमता आपणामध्ये निर्माण होईल, ही जबाबदारी नक्कीच आमची...!

**डॉ. ज्ञानेश्वर गोरे**

(प्राचार्य)

***सदर माहिती पुस्तिका म्हणजे महाविद्यालयाचा आरसा आहे ;***
***तेव्हा या माहिती पुस्तिकेचे वाचन विद्यार्थ्यांनी गांभिर्यपूर्वक करावे.***

## अभ्यासक्रम निवडताना...

१० वी नंतर जेव्हा आपण महाविद्यालयात प्रवेश घेतो त्यावेळी बहुसंख्य विद्यार्थ्यासमोर प्रश्न निर्माण होतो की, कोणती ज्ञानशाखा निवडावी. पालकांसमोरही हाच प्रश्न असतो. ज्यांचे शिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट असते अशा विद्यार्थ्यांना हा प्रश्न पडत नाही. पुढे आपल्याला काय व्हायचं, हे निश्चित केले तर विद्याशाखेची निवड सहज करता येते.

जो अभ्यासक्रम आपण निवडणार, तो आपण का शिकला पाहिजे? तो शिकल्यामुळे आपल्याला नेमका कोणता उपयोग होणार आहे. त्यातून आपणास कोणती नोकरी मिळू शकेल, अथवा कोणता व्यवसाय करता येईल. कोणता आर्थिक फायदा होऊ शकेल याची माहिती करुन घेतली पाहिजे. तसेच आपल्या आवडीचा विषय कोणता आहे, कोणती शाखा आवडते, कोणत्या अभ्यासक्रमात आपण प्रगती करू शकतो किंवा आपल्या मर्यादा काय आहेत हेही लक्षात घेतले पाहिजे.

अभ्यासक्रमाची निवड करताना आपली बौध्दिक पातळी व आवड महत्त्वाची आहे. पालकांच्या इच्छेमुळे, मित्राच्या आग्रहामुळे किंवा मैत्रिणीच्या सोबतीमुळे आपणास नको असलेल्या अभ्यासक्रमाची निवड करू नये. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या बौध्दिक पात्रतेनुसार अभ्यासक्रमाची निवड केली तर ते त्यात अधिक प्रगती करू शकतात. विशिष्ट विद्याशाखा निवडल्यास आपल्यासाठी निर्माण होणाऱ्या व्यावसायिक संधी पुढील प्रमाणे :

## वाणिज्य शाखा

१) सी.ए.(चार्टर्ड अकाऊंटंट)
२) आय.सी.डब्ल्यू.ए.
३) सी.एस. (कंपनी सेक्रेटरी)
४) एम.कॉम.
५) एम.बी.ए.
६) एम.ए. अर्थशास्त्र
७) एल.एल.बी.
८) कम्प्युटर प्रोग्रामिंग
९) कम्प्युटर अकाऊंटींग
१०) एम.सी.एम.
११) जी.डी.सी.अॅण्ड ए.
१२) बी.लीब./एम.लीब.
१३) डिप्लोमा इन अॅडव्हरटाईजिंग
१४) डी.टॅक्स.

## कला शाखा

१) एम.ए.
२) बी.एड. / बी.पी.एड.
३) बी.लीब./एम.लीब.
४) एल.एल.बी.
५) एम.एस.डब्ल्यू.
६) कम्प्युटर प्रोग्रामिंग
७) डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट
८) बी.जे./एम.जे.

## विज्ञान शाखा

१) एम.एस्सी.
२) बी.एड.
३) बी.लीब./एम.लीब.
४) एल.एल.बी.
५) डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट
६) बी.जे./एम.जे.

या तीनही शाखेचे महत्त्व सारखेच असून वरील तीनही शाखेतील पदवीधरांना सेट, नेट, एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी., स्टाफ सिलेक्शन, बँकींग व विविध स्पर्धा परीक्षा देता येतात.

## विद्याशाखा व अभ्यासक्रमाचे विषय

या महाविद्यालयात या सत्राकरिता मराठी माध्यमातून वर्ग ११ वी व १२ वी कला व वाणिज्य तसेच बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. या पदवी अभ्यासक्रमासह एम.ए., एम.कॉम. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.

### ● कनिष्ठ महाविद्यालय ●

कला विभाग ११ वी व १२ वी
१) इंग्रजी
२) मराठी
३) अर्थशास्त्र
४) सहकार
५) राज्यशास्त्र
६) इतिहास

वाणिज्य विभाग ११ वी व १२ वी
१) इंग्रजी
२) मराठी
३) अर्थशास्त्र
४) सहकार
५) लेखाकर्म
६) व्यवसाय संघटन

# • वरिष्ठ महाविद्यालय •

# कला शाखा

## बी.ए.

१) इंग्रजी आवश्यक (1001) २) मराठी आवश्यक (1011)

**ऐच्छिक विषय ( कोणतेही तीन )**

१) अर्थशास्त्र (1022) २) राज्यशास्त्र (1025)

३) इतिहास (1021) ४) मराठी वाङ्मय (1052) / इंग्रजी वाङ्मय (1051)

५) भूगोल (1111)

बी.ए. प्रथम वर्षाला घेतलेले ऐच्छिक विषय द्वितीय व तृतीय वर्षाला कायम असतील. तसेच बी.ए. द्वितीय वर्षाला पर्यावरण अभ्यास हा विषय आवश्यक असेल.

# वाणिज्य शाखा

## बी.कॉम. प्रथम वर्ष

**SEMESTER - I**

1) English (BC-11)
2) Marathi (BC-12)
3) Advanced Accountancy (BC-13)
4) Principles of Economics (BC-14)
5) Principles of Business Management (BC-15)
6) Computer Fundamentals and Operating Systems -I (BC-16)

**SEMESTER - II**

1) English (BC-21)
2) Marathi (BC-22)
3) Financial Accounting (BC-23)
4) Business Economics (BC-24)
5) Principles of Business Organization (BC-25)
6) Computer Fundamentals & Operating Systems -II (BC-26)

## बी.कॉम. द्वितीय वर्ष

**SEMESTER - III**

1) English (1001)
2) Marathi (1011)
3) Company Account (3031)
4) Business Mathematics (3032)
5) Auditing (3033)
6) Monitory System (3034)
7) Information Technology and Business Data Processing-I (3035)

**SEMESTER - IV**

1) English (1001)
2) Marathi (1011)
3) Corporate Accounting (3041)
4) Business Statistics (3042)
5) Income Tax (3043)
6) Indian Financial System (3044)
7) Information Technology and Business Data Processing-II (3045)

## बी.कॉम. तृतीय वर्ष

**SEMESTER - V**

1) English (1001)
2) Marathi (1011)
3) Cost Accounting (3051)
4) Business Environment (3052)
5) Business Regulatory Framework (3053)
6) Internet and World Wide Web-I (3058)
7) E-Commerce-I (3059)

**SEMESTER - VI**

1) English (1001)
2) Marathi (1011)
3) Management Accounting (3061)
4) Economics of Development (3062)
5) Company Law (3063)
6) Internet and World Wide Web-II (3068)
7) E-Commerce-II (3069)

# विज्ञान शाखा

विज्ञान विद्याशाखेतील विषयांचे ५ गट करण्यात आले आहेत. विद्यार्थ्याला यापैकी एक गट निवडावा लागेल. बी.एस्सी प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्याने जो गट निवडला असेल तोच गट त्याला बी.एस्सी. द्वितीय आणि बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी घ्यावा लागेल. बी.एस्सी प्रथम वर्षासाठी इंग्रजी आणि मराठी हे भाषा विषय आवश्यक विषय आहेत. बी.एस्सी. द्वितीय आणि तृतिय वर्षासाठी भाषाविषय अभ्यासासाठी राहणार नाहीत.

| Sr.No. | Group | Subjects | Total Seats |
|---|---|---|---|
| 1 | A | Microbiology, Chemistry, Zoology | 25 |
| 2 | B | Microbiology, Chemistry, Botany | 25 |
| 3 | C | Chemistry, Zoology, Botany | 25 |
| 4 | D | Computer Science, Physics, Mathematics | 25 |
| 5 | E | Chemistry, Physics, Mathematics | 20 |

# एम.ए. मराठी

## प्रथम वर्ष

**सत्र -१**

पेपर -१ : मराठी साहित्याची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी (आरंभ ते १८१८) -MS11

पेपर-२ : साहित्य विचार - MS12

पेपर-३ : लोकसाहित्य - MS14

पेपर-४ : विशेष वाङ्मय प्रकार : कविता- MS17

**सत्र -२**

पेपर-१ : मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी (१८१८ ते १९६०) -MS21

पेपर-२ : समीक्षाविचार - MS22

पेपर-३ : लोकसाहित्य - MS24

पेपर-४ : विशेष वाङ्मय प्रकार : नाटक- MS27

## द्वितीय वर्ष

**सत्र -३**

पेपर-१ : उपयोजित मराठी २५२१

पेपर-२ : भाषाविज्ञान २५२२

पेपर-३ : विशेष ग्रंथकार :संत चोखामेळा २५२३

पेपर-४ : दलित साहित्य २५२७

**सत्र -४**

पेपर-१ : उपयोजित मराठी २५३१

पेपर-२ : भाषाविज्ञान २५३२

पेपर-३:मराठी वैचारिक साहित्य २५३४

पेपर-४ : मुस्लिम मराठी साहित्य २५३८

# एम.ए. इंग्रजी

## Part - I

**Semester : I**

Paper - I History of English Literature - I (DSCENG101)

Paper - II Literary Criticism-I (DSCENG102)

Paper - III Drama - I (DSEENG104)

Paper - IV Fiction (DSEENG105)

**Semester : II**

Paper - I History of English Literature - II (DSCENG201)

Paper - II Literary Criticism-II (DSCENG202)

Paper - III Drama - II (DSEENG204)

Paper - IV Non Fiction (DSEENG205)

Paper - V Practical Criticism (GICENG206)

## Part - II

**Semester : III**

Paper - I : Indian Writing in English -2221
Paper - II Critical Theories-2222
Paper - III American Literature-I -2223
Paper-IV Shakespearean Studies-2228

**Semester : IV**

Paper - I : Indian Writing in English - 2231
Paper - II Critical Theories -2232
Paper - III American Literature-II-2233
Paper - IV Cultural Studies -2237

# एम. कॉम.

## Part - I

**SEMESTER-I**

1) Managerial Economics (MCOM-11)
2) Services Marketing and Customer Relationship Management. (MCOM-12)
3) Advanced Financial & Cost Accounting (MCOM-13)
4) Banking & Insurance Services. (MCOM-14)

**SEMESTER-II**

1) Accounting for Managerial Decisions (MCOM-21)
2) Strategic Management (MCOM-22)
3) Management Concept & Organisational Behaviour (MCOM-23)
4) Computer Applications in Business. (MCOM-24)

## Part - II

**SEMESTER-III**

1) Research Methodology (MCOM-31)
2) Statistical Analysis (MCOM-32)
3) Corporate Tax & Management (MCOM-33)
4) E-Commerce and legal security.(MCOM-34)

**SEMESTER-IV**

1) Entrepreneurship and skill Development (MCOM-41)
2) Sales & Distribution Management (MCOM-45)
3) Co-operative Management (MCOM-46)
4) International Financing (MCOM-47)

## कौशल्य शिक्षण अंतर्गत पदवी अभ्यासक्रम

# Bachelor of Vocation in Agriculture Science

देऊळगाव राजा परिसरातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व उद्यमशील शिक्षण मिळावे यासाठी केंद्र शासनाच्या HRD मंत्रालय व Ministry for Skill Development द्वारे मंजूर व पुरस्कृत केलेला तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित B.Voc. (Bachelor of Vocation) हा तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

Bachelor of Vocation अंतर्गत विद्यार्थ्यांना Agriculture Science या पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो. यासाठी विज्ञान विद्याशाखेतून इयत्ता बारावीची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांस डिप्लोमा, दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास ॲडव्हान्स डिप्लोमा व तीन वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास पदवी प्राप्त करता येते. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी **डॉ.एकनाथ भालेराव** यांच्याशी संपर्क साधावा.

या अभ्यासक्रमामुळे उद्योगधंद्यांसाठी उपयुक्त असा रोजगार वर्ग उपलब्ध होऊ शकतो. तसेच देऊळगाव राजा परिसरातील विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रात करिअर करण्याची सुवर्ण संधी प्राप्त होणार आहे.

## First Year

**SEMESTER-I**

1 1BVCGEC-1:Communication Skill- I
2 1BVCGEC-2:Applied Computer Skill- I
3 1BVCAS-3 : Agronomic Principles, Practices & Meteorology
4 1BVCAS-4 : Soils and Soil Fertility Management
5 1BVCAS-5 : Principles of Entomology and Economic Entomology
6 1BVCGEC-6: Communication Skill-I-Lab
7 1BVCGEC-7: Applied Computer Skill -I Lab
8 1BVCAS-8 : Agronomic Principles, Practices & Meteorology- Lab
9 1BVCAS-9 : Soils and Soil Fertility Management-Lab
10 1BVCAS-10 : Principles of Entomology and Economic Entomology -Lab
11 1BVCAS-11: Field Work/ Industrial Visit

**SEMESTER-II**

1 2BVCGEC-1 : Communication Skill- II
2 2BVCGEC-2 : Applied Computer Skill- II
3 2BVCAS-3 : Farm Power, Machinery And Post Harvesting Technology
4 2BVCAS-4 : Vegetable Culture And Nursery Management
5 2BVCAS-5 : Water Harvest, Irrigation Technology & Weed Management
6 2BVCGEC-6 : Communication Skill-II- Lab
7 2BVCGEC-7 : Applied Computer Skill -II Lab
8 2BVCAS-8 : Farm Power, Machinery And Post Harvesting Technology -Lab
9 2BVCAS-9 : Vegetable Culture And Nursery Management
10 2BVCAS-10 : Water Harvest, Irrigation -Lab Technology & Weed Management-Lab
11 2BVCAS-11: Field Work/ Industrial Visit

## Second Year

**SEMESTER-III**

1 3BVCGEC-1 : Communication Skill- III
2 3BVCGEC-2 : Applied Computer Skill- III
3 3BVCAS-3 : Breeding Of Field Crops, Seed Production, Testing And Certification
4 3BVCAS-4 : Manures And Fertilizers
5 3BVCAS-5 : Crop Pests And Their Management
6 3BVCGEC-6 : Communication Skill-III-Lab
7 3BVCGEC-7 : Applied Computer Skill -III Lab
8 3BVCAS-8 : Breeding Of Field Crops, Seed Production, Testing And Certification -Lab
9 3BVCAS-9 : Manures And Fertilizers-Lab
10 3BVCAS-10 : Crop Pests And Their Management- Lab
11 3BVCAS-11 : Field Work/ Industrial Visit

**SEMESTER-IV**

1 4BVCGEC-1: Communication Skill- IV
2 4BVCGEC-2 : Soft Skill Development-I
3 4BVCAS-3 : Plant Pathology, Crop Diseases And Their Management
4 4BVCAS-4 : Commercial Floriculture And Ornamental Gardening
5 4BVCAS-5 : Agronomy Of Field Crops
6 4BVCGEC-6 : Communication Skill-IV-Lab
7 4BVCGEC-7: Soft Skill Development-I Lab
8 4BVCAS-8 : Plant Pathology, Crop Diseases And Their Management -Lab
9 4BVCAS-9 : Commercial Floriculture And Ornamental Gardening Lab
10 4BVCAS-10 : Agronomy Of Field Crops Lab
11 4BVCAS-11 Field Work/ Industrial Visit

## Third Year

**SEMESTER-V**

1 5BVCGEC-1 : Communication Skill- V
2 5BVCGEC-2 : Soft Skill Development-II
3 5BVCAS-3 : Land Surveying, Watershed Management And Green House Technology
4 5BVCAS-4 : Fruit Culture And Propagation
5 5BVCGEC-5 : Communication Skill-V-Lab
6 5BVCGEC-6 : Soft Skill Development-II Lab
7 5BVCAS-7 : Land Surveying, Watershed Management And Green House Technology- Lab
8 5BVCAS-8 : Fruit Culture And Propagation -Lab
9 4BVCAS-9 : Seminar & Internship (1Month)

**SEMESTER-VI**

1 6BVCGEC-1: Industrial Organization & Management
2 6BVCGEC-2 : Soft Skill Development-III
3 6BVCAS-3 : Organic Farming And Integrated Farming System
4 6BVCAS-4 : Agro Forestry, Medicinal And Aromatic Plants
5 6BVCGEC-5 : Industrial Organization & Management Lab
6 6BVCGEC-6 : Soft Skill Development-III Lab
7 6BVCAS-7 : Organic Farming And Integrated Farming System-Lab
8 6BVCAS-8 : Agro Forestry, Medicinal And Aromatic Plants
9 6BVCAS-9 : Seminar & Internship (1 Month) Lab

**विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या सर्व सूचना व इतर माहितीसाठी वेळोवेळी महाविद्यालयाच्या www.svcdraja.org या वेबसाईटला भेट द्यावी.**

## प्रवेशासंबंधी महत्त्वाच्या सूचना

१) दहावीमध्ये पहिल्या प्रयत्नात ४५ टक्के आणि दुसऱ्या प्रयत्नात ५० टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी (कला/वाणिज्य) मध्ये सरळ प्रवेश देण्यात येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी १० वीचा निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच प्रवेश घेणे आवश्यक आहे.

२) बारावीमध्ये पहिल्या प्रयत्नात ४५ टक्के आणि दुसऱ्या प्रयत्नात ५० टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. प्रथम वर्षामध्ये सरळ प्रवेश देण्यात येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी १२ वीचा निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच प्रवेश घेणे आवश्यक आहे.

३) महाविद्यालयातील इतर सर्व वर्गांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना सरळ प्रवेश देण्यात येईल.

४) महाविद्यालयातील प्रत्येक वर्गाची अपेक्षित प्रवेशसंख्या शासकीय नियमाप्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे. म्हणून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी निकाल जाहीर झाल्यानंतर लवकरात लवकर प्रवेश घेणे आवश्यक आहे.

५) प्रवेशाची संख्या, त्यासंबंधीचे आरक्षण, प्रवेश पात्रता, त्यासाठी भरावे लागणारे शुल्क, सोबत जोडावी लागणारी कागदपत्रे याबाबतीत विद्यापीठाच्या आणि शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

६) प्रवेशासाठी निर्धारित केलेले विहित नमुन्यातील आवेदनपत्र पूर्ण आणि सुवाच्च हस्ताक्षरात भरलेले असावे.

७) अपूर्ण भरलेले, चुकीची किंवा विसंगत माहिती असलेले, विद्यार्थ्यांचे छायाचित्र नसलेले आवेदनपत्र प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाही.

८) इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचा मूळ दाखला आणि मूळ गुणपत्रिका, त्यांच्या प्रत्येकी दोन प्रमाणित सत्यप्रतींसह, आवेदनपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९) महाराष्ट्राबाहेरील बोर्डाची एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन ११ वीत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी अमरावती बोर्डाचे योग्यता प्रमाणपत्र आणल्यावरच त्यांचा प्रवेश अधिकृत मानला जाईल.

१०) महाविद्यालयाने दिलेल्या प्रवेशास बोर्ड/विद्यापीठ यांची अंतिम मान्यता मिळणे

आवश्यक असते. काही कारणास्तव त्यांची मान्यता मिळाली नाही तर संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द होऊ शकतो. अशाप्रकारे प्रवेश रद्द झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

११) महाविद्यालयात प्रथमच पदवी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा मूळ दाखला तसेच एच.एस.सी. ची गुणपत्रिका (दोन प्रमाणित सत्यप्रतींसह) आवेदनपत्रासोबत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

१२) या महाविद्यालयाच्या नियमित विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात प्रवेश घेण्यासाठी पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर म्हणजे विद्यापीठाच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रवेश घ्यावा. त्यानंतर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची हमी देता येणार नाही.

१३) विद्यापीठ नामांकनासाठी बी.ए.भाग-१/बी.कॉम.भाग-१/बी.एस्सी. भाग १ या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांची मूळ गुणपत्रिका (सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिकांसह) प्रवेश अर्जासोबत देणे आवश्यक आहे.

१४) अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या इतर महाविद्यालयातून परीक्षा उत्तीर्ण होऊन वरच्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी, अपवादात्मक परिस्थितीत 'सत्र-मध्या'त प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तसेच अमरावती विद्यापीठाखेरीज इतर विद्यापीठांच्या परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश समिती आणि कार्यालयाच्या निर्देशानुसार आवश्यक त्या सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

१५) कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे (पेज क्र. १३ व १४) निर्धारित शुल्क व निधी भरणे बंधनकारक आहे. त्यामध्ये कोणत्याही कारणास्तव वेगळी सूट किंवा सवलत मिळणार नाही.

१६) एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणामुळे महाविद्यालय सोडावयाचे असल्यास प्रवेशासाठी भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

१७) विशिष्ट परिस्थितीत 'स्थानिक प्रवेश व विद्यार्थी समुपदेशन समिती' च्या शिफारशीनुसार प्राचार्यांना कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश नाकारण्याचा अधिकार राहील.

## प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

अ) विद्यालय अथवा महाविद्यालय सोडण्याचे मूळ प्रमाणपत्र (टी.सी.) व सोबत तिच्या प्रमाणित (Attested) प्रती – २

ब) पात्रता परीक्षेच्या गुणपत्रिकेच्या प्रमाणित (Attested) प्रती – २

क) तीन कलर पासपोर्ट साईज फोटो

ड) आधार कार्डची सत्यप्रत – २

इ) मतदार ओळखपत्राची सत्यप्रत – १

ई) जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (मागास प्रवर्गासाठी) – २

फ) महाराष्ट्राबाहेरील बोर्डाची एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा संगाबाअवि, अमरावती विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठातून पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मूळ स्थानांतर प्रमाणपत्र (Original Migration Certificate) व त्याची एक सत्यप्रत सादर करावी.

**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी माहितीपुस्तिकेतील शिष्यवृत्ती अर्ज त्यावरील नमूद सर्व कागदपत्रांसह सादर करावा.**

## प्रवेश प्रक्रिया

- दहावी, बारावी आणि विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित वर्गांमध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया लगेच सुरू करण्यात येते.
- प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळावे, म्हणून महाविद्यालयाने 'स्थानिक प्रवेश व विद्यार्थी समुपदेशन समिती' ची स्थापना केली आहे. ही समिती त्या कालावधीत आपल्या कार्यालयात विशिष्ट वेळेत उपस्थित राहणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंदर्भात काही अडचणी असतील तर या समितीशी संपर्क साधावा.

## प्रवेश शुल्कासंबंधी मार्गदर्शन

महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना आवश्यक ते शुल्क भरावे लागते. या शुल्कासंबंधीची सविस्तर माहिती या पुस्तिकेत पेज क्र. १३ व १४ वर दर्शविलेल्या तत्त्यात नमूद केलेली आहे. शुल्कासंबंधी काही खुलासा हवा असल्यास त्यासाठी कार्यालयातील **श्री.एम.आर. जगदाळे** यांच्याशी संपर्क साधावा.

## ई.बी.सी. सवलती बाबत माहिती

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत दिल्या जाते. महा DBT (https://mahadbtmahait.gov.in/Home/Index) नुसार ज्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यास शिक्षण शुल्क माफीची सवलत दिल्या जाईल.

ई.बी.सी. सवलत मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे –

१) तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे पालकाचे रु. ८.०० लाख पर्यंतचे उत्पन्न प्रमाणपत्र

२) वडील हयात नसल्यास त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची सत्यप्रत

३) रेशन कार्डची सत्यप्रत  ४) आधार कार्डची सत्यप्रत

**टीप : कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे वा इतर कारणामुळे ई.बी.सी. सवलत मंजूर न झाल्यास संबंधित विद्यार्थ्यास पूर्ण फी भरावी लागेल.**

## भरावयाच्या शुल्कासंदर्भात विशेष सूचना

- 'फी' च्या तक्त्यातील निर्देशित शुल्क शासन, विद्यापीठ व महाविद्यालय यांनी वेळोवेळी केलेल्या बदलांच्या आधीन राहतील आणि त्याप्रमाणे मागणी केल्याबरोबर विद्यार्थ्यांना ते विनाविलंब भरावे लागतील.
- भा.स.शि. व इतर फी सवलती प्राप्त विद्यार्थ्यांना शासनाकडून परिपूर्ती न मिळणारे शुल्क देय राहतील.
- विनाअनुदानित विषय अथवा वर्गाच्या विद्यार्थ्यांना उदा. बी.एस्सी. प्रथम वर्ष अतिरिक्त तुकडी, कला शाखांतर्गत मराठी वाङ्मय, इंग्रजी वाङ्मय, भूगोल, गृहअर्थशास्त्र या विषयांसाठी व एम.ए. मराठी, एम.ए. इंग्रजी, एम.कॉम. या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालय, विद्यापीठ आणि शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेले शुल्क भरावे लागेल.

## शुल्क व निधी (Fees & Fund)

**● JUNIOR COLLEGE FEES ●**

| S.N. | Name of Head | XI | XII |
|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 16 | - |
| 2 | Tuition Fee | 192 | 216 |
| 3 | Term Fee | 32 | 36 |
| 4 | Library Fee | 70 | 70 |
| 5 | College Magazine Fee | 70 | 70 |
| 6 | Facilities Fee | 20 | 20 |
| | **TOTAL** | **400** | **412** |

# SENIOR COLLEGE FEE

| Sr. No. | Name of Head | GRANTED | | | | | | NON-GRANTED | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | B.A. | | B.Com. | | B.Sc. | | M.A. | M.Com. |
| | | I | II&III | I | II&III | I | II&III | I / II | I / II |
| 1 | Tuition Fee | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 3000 | 3000 |
| 2 | Laboratory Fee (Only for Practical Subject) | 485 | 485 | 485 | 485 | 965 | 965 | 0 | 2665 |
| 3 | Library Fee | 160 | 160 | 160 | 160 | 160 | 160 | 1330 | 1330 |
| 4 | Games & Sports Fee | 160 | 160 | 160 | 160 | 160 | 160 | 0 | 0 |
| 5 | E.C.A. Fee | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 0 | 0 |
| 6 | College Magazine Fee | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 0 | 0 |
| 7 | Identity Card Fee | 35 | 35 | 35 | 35 | 35 | 35 | 35 | 35 |
| 8 | SWF+SCF+EF+Ins.Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 40 | 40 |
| 9 | Medical Exam. Fee | 55 | 55 | 55 | 55 | 55 | 55 | 0 | 0 |
| 10 | Phy. Efficiency Test Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 0 | 0 |
| 11 | Facilities Fee | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 805 | 805 |
| 12 | College Exam Fee | 120 | 120 | 120 | 120 | 120 | 120 | 100 | 100 |
| 13 | Vehicle Stand Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 50 | 50 |
| 14 | Security Charges | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 50 | 50 |
| 15 | Green & Smart Campus Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 0 | 0 |
| 16 | E-Suvidha | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 0 | 0 |
| 17 | Excursion/Indu.Tour/Field Visit | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 0 | 0 |
| 18 | Uni. Annual Fee | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 |
| 19 | Uni. Corpus Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 20 | Uni. SWF+SCF+EF+Ins.Fee | 35 | 35 | 35 | 35 | 35 | 35 | 35 | 35 |
| 21 | Uni. e-Suvidha | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 22 | Uni. Sport Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 23 | Uni. Ashwamedh (IUSM) Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 24 | Uni. Enrollment Fee | 120 | 0 | 120 | 0 | 120 | 0 | 0 | 0 |
| 25 | Uni. Sant Gadge Baba Studies Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| | **Total** | **2700** | **2580** | **2700** | **2580** | **3180** | **3060** | **5640** | **8305** |

RS. 160/- WILL BE ADDITION TO ABOVE FEE ONLY FOR SECOND YEAR U.G. FOR ENVIRONMENTAL STUDIES.

Additional Division Fees (Non Grant) 1) B.A.- Rs. 5445/- 2) B.Sc. - Rs. 8645/-

B.Voc. Fees : 12080/-

**Note : 1) The Above Mentioned Fees is According to Uni.Notification No. 42/2022, Dt. 28/04/2022**
**2) The Above Mentioned Fees is Applicable for General Category Students Only.**
**3) B.Sc. Part I (Division A) is on Grant-in-Aid basis - (Admission Strength - 120)**
**B.Sc. Part I (Division B) is on Non-Grant basis.**
**The student will have to pay the Fees prescribed by the university at the time of admission.**

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या GOI शिष्यवृत्तीबाबत महत्त्वपूर्ण सूचना

१) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याने माहिती पुस्तिकेच्या (Prospectus) शेवटी जोडलेले शिष्यवृत्ती संबंधीचे माहितीपत्रक अचूकपणे भरुन देणे आवश्यक आहे व नमूद केलेली सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

२) पूर्णवेळ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मिळत नाही. ही अट विचारात घेऊन शिकत असताना नोकरी मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी तसे महाविद्यालयाच्या कार्यालयाला तत्परतेने कळवावे.

३) विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडलेला असल्यास विद्यार्थ्याने आपल्या शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत संबंधित कालखंडामध्ये शिष्यवृत्ती मिळाली नसल्यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र (गॅप अफिडेव्हीट) जोडणे आवश्यक आहे.

४) प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला विद्यार्थी ए.टी.के.टी. च्या दोन संधीमध्ये उत्तीर्ण न झाल्यास त्या वर्षी त्याचा शैक्षणिक खंड/गॅप झाला असे मानल्या जाते. शिष्यवृत्ती अर्ज भरताना त्या वर्षीचे शैक्षणिक खंड प्रमाणपत्र तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे (रु.२० च्या स्टॅम्प पेपरवर) सादर करणे अनिवार्य राहील.

५) शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेले बँक खाते आपल्या आधार कार्डाशी लिंक असल्याचे प्रमाणपत्र ०२ प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत सुरु असलेल्या बँक खात्याच्या पासबुकची सत्यप्रत सादर करावी.

६) शाळा सोडल्याच्या दुय्यम प्रतीवर प्रवेश घेतल्यास किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून किंवा मध्येच अभ्यासक्रम सोडून या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. त्यास अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत पूर्ण फी भरावी लागेल.

८) प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांनी मागील वर्षी शिष्यवृत्ती अर्ज भरला असल्यास त्याच्या युजर आयडी व पासवर्ड ची प्रत शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

९) प्रथम वर्षाला शिष्यवृत्ती अर्ज भरला नसल्यास / शिष्यवृत्ती मिळाली नसल्यास उर्वरित शैक्षणिक वर्षांमध्ये समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्तीचा लाभ न मिळाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

१०) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती तसेच व्याख्याने / प्रात्यक्षिके/ रा.से.यो. / एन.सी.सी. / शारीरिक शिक्षण उपक्रम इत्यादींसाठी किमान ७५% उपस्थिती असणे बंधनकारक आहे. ७५% पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासन नियमानुसार शिष्यवृत्ती मिळणार नाही.

११) शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची पूर्तता न केल्यास आणि त्या कारणामुळे संबंधित विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळविण्यास अपात्र ठरत असल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

## उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत असते. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्ती योजनांसाठीची माहिती वेळोवेळी प्राप्त करून घ्यावी. ऑक्टोबर, २०२३ पासून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

**महाडीबीटी पोर्टल वर विद्यार्थी खालील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकतात.**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना
३) एकलव्य आर्थिक सहाय्य
४) गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर)
५) गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर)
६) राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती
७) शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती
८) जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती
९) राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती
१०) गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती
११) शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती
१२) राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग २)
१३) माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य
१४) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य

**विद्यार्थ्यांसाठी सूचना :**

१) उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी https://mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.
२) शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.
३) उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.
४) विद्यार्थी डि.बी.टी. पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु

शकतात. तथापि संबंधित विद्यार्थ्यास त्याने निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.

५) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदवितांना ते टक्केवारी मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तीच्या अटीनुसार (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

७) शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकासह किंवा विना आधार या ऑप्शनसह अर्ज करता येतो. तथापि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे. याची नोंद घ्यावी.

**संदर्भ :**

१) शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र. १४६/मशि-२, दिनांक ०२.०८.२०१७

२) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दिनांक ०७.१०.२०१७

३) शासन निर्णय क्र. -जीएडी-मावंस-२०१८/सी.आर.१३८/एस.१/३९
दिनांक १२.१०.२०१८

*** शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे ( सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत याची नोंद घ्यावी )**

१) जातीच्या दाखल्याची सत्यप्रत

२) शाळा सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत

३) आधार कार्डची सत्यप्रत

४) तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे पालकाचे उत्पन्न प्रमाणपत्र

५) पालकाचा उत्पन्नाबाबतचा प्रतिज्ञा लेख (रु. २० च्या कोर्ट फी स्टॅम्पवर)

६) शैक्षणिक / शिष्यवृत्ती खंड असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (रु. २० च्या कोर्ट फी स्टॅम्पवर)

७) बँक पासबुकची सत्यप्रत (सुरु असलेलेच बँक खाते) / पोस्ट ऑफीस बचत खाते कार्डची सत्यप्रत

८) बँक खाते आधार कार्डशी लिंक असल्याचे प्रमाणपत्र (२ प्रतीमध्ये)

९) मागील तीन वर्षाच्या गुणपत्रिकेच्या सत्यप्रती तसेच १० वी पास / नापास (प्रथम वेळ) गुणपत्रिकेची सत्यप्रत

१०) इयत्ता १० वी च्या बोर्ड प्रमाणपत्राची सत्यप्रत

११) रेशनकार्डची सत्यप्रत

१२) वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्राची सत्यप्रत

१३) मागील वर्षी शिष्यवृत्ती अर्ज भरला असल्यास त्याचा युजर आयडी व पासवर्ड द्यावा. (फक्त प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी)

**सूचना : व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या किंवा मध्येच अभ्यासक्रम सोडून आलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. कागदपत्राच्या अपूर्ततेमुळे शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास अडचण आल्यास व विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
## विद्यार्थी विकास विभाग

### * विद्यार्थी हितार्थ योजना *

**विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाद्वारे विद्यार्थी हितार्थ खालील योजना राबविल्या जातात.**

* विद्यार्थी सुरक्षा विमा योजना
* विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती
* स्व. प्रा. रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती
* संत गाडगे बाबा विद्याधन योजना
* संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना
* संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना
* संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना
* संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना

**टीप : वरील योजनांविषयी माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in संकेतस्थळास भेट द्यावी.**
**संदर्भ : संगाबाअवि/१३/३९/२०१८, दिनांक २३/०७/२०१८**

---

**महाविद्यालयातर्फे खालील विद्यार्थी कल्याण विषयक योजना उपलब्ध करुन दिल्या जातात.**

* विद्यार्थी सहाय्यता निधी
* कमवा व शिका योजना
* स्कॉलरशिप, फ्रीशिप, पी.टी.सी., ईबीसी सवलत
* अल्पसंख्यांक स्कॉलरशिप
* गुणवत्ता स्कॉलरशिप
* वैद्यकीय तपासणी
* रक्तगट तपासणी
* हिमोग्लोबीन तपासणी
* एच.आय.व्ही. तपासणी
* विद्यार्थी सुविधा केंद्र
* गुणवंत विद्यार्थ्यांसाठी रोख पारितोषिके
* उत्कृष्ट 'लायब्ररी युजर' पारितोषिक
* गरजुंना तात्काळ रक्त पुरवठ्यासाठी सहकार्य
* एन.सी.सी. व एन.एस.एस.
* रुग्णवाहिका

## महाविद्यालयाचे नियम

**१) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणामुळे महाविद्यालय सोडायचे असल्यास प्रवेशासाठी भरलेले शुल्क व दिलेली मूळ कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही.**

२) विद्यार्थ्याकडे अभ्यासक्रमात नमूद केलेली सर्व पाठ्यपुस्तके असणे आवश्यक आहे. पुस्तकाशिवाय वर्गात बसणे विद्यार्थ्यांना लाभदायक नसते.

**३) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या परिसरात जाहिराती व सूचना फलके लावता येणार नाही तसेच कोणतेही कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.**

४) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या वैद्यकीय तपासणीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी वैद्यकीय तपासणीस गैरहजर राहतील ते विद्यापीठ परीक्षेला बसण्याकरिता अपात्र ठरविल्या जाऊ शकतात.

५) महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या प्रत्येक परीक्षेला विद्यार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी महाविद्यालयातील परीक्षांना गैरहजर असतील त्यांना प्रत्येक विषयासाठी रु. ४०/- दंड आकारला जाईल व गैरहजर तसेच सतत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बोर्ड व विद्यापीठाच्या परीक्षेला अपात्र ठरविल्या जाऊ शकते.

६) विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची किमान ७५ % उपस्थिती अनिवार्य आहे.

७) विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे आवश्यक शुल्क भरल्याशिवाय त्यांना महाविद्यालयाकडून कोणताही दाखला मिळू शकणार नाही. इतकेच नव्हे तर त्यांना विद्यापीठाच्या परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

८) शासकीय सवलती व शिष्यवृत्ती प्राप्त करू इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी आपण पात्र असलेल्या विविध सवलती / शिष्यवृत्तींपैकी कोणत्याही एकाच सवलत / शिष्यवृत्तीची निवड करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी व त्याच्या पालकाची राहील. याबाबतीत आवश्यक ते मार्गदर्शन महाविद्यालयाकडून मिळत राहील.

**९) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयातील सूचना फलक नियमित वाचावे. सूचना फलकावर प्रवेशासंबंधी, शिष्यवृत्ती संबंधी, परीक्षेसंबंधी अत्यंत महत्त्वाच्या सूचना दिलेल्या असतात.**

१०) महाविद्यालयात वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कार्यक्रम सुरु असताना महाविद्यालयीन परिसरात फिरणाऱ्या विद्यार्थ्यावर कारवाई केली जाईल.

**११) महाविद्यालयाच्या परिसरात सिगारेट व गुटखा सेवनास सक्त बंदी करण्यात आलेली असून सर्व विद्यार्थ्यांनी या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. पालन न करणाऱ्या विरुध्द कडक कारवाई केली जाईल.**

*महाविद्यालयाचा सर्व परिसर सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या निगराणीमध्ये आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये बेशिस्त वर्तन करु नये. एखादा विद्यार्थी शिस्तीचा भंग करताना आढळल्यास त्या विद्यार्थ्यावर कारवाई केली जाईल.*

## विद्यार्थी शिस्तविषयक नियम

१. प्रत्येक विद्यार्थ्याने वर्गात शिस्त पाळणे आवश्यक आहे.

२. तासिका सुरू होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गात स्थानापन्न होणे आवश्यक आहे. तासिका ऑफ असल्यास विद्यार्थ्यांनी विनाकारण व्हरांड्यात किंवा इमारतीच्या परिसरात फिरणे, मोठ्याने मोबाईल वाजवणे, कॅन्टीनवर गोंधळ करणे अशी कृती करून परिसरातील शांतता व महाविद्यालयाच्या शिस्तीचा भंग करू नये. ग्रंथालयात वाचन करावे, मैदानावर, इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्समध्ये खेळ खेळावे किंवा क्रीडांगणावर सावलीच्या ठिकाणी बसावे.

३. महाविद्यालयात प्रवेश करताना विद्यार्थ्यांना गणवेश व महाविद्यालयाचे ओळखपत्र परिधान करावे. त्याशिवाय महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.

४. दर गुरुवारी विद्यार्थ्यांना गणवेशातून सूट देण्यात आली आहे. असे असले तरी विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सुयोग्य पोषाख परिधान करावा व महाविद्यालयाचे ओळखपत्र गळयात परिधान करुनच महाविद्यालयात प्रवेश करावा.

५. विद्यार्थ्यांनी आपसात वाद घालू नये. काही तक्रार असल्यास विद्यार्थी तक्रार निवारण समितीशी संपर्क साधावा. ही समिती प्राचार्यांशी चर्चा करेल, प्राचार्य योग्य तो निर्णय घेतील. मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये महाविद्यालयात प्रवेशित नसलेल्या असंबंधीत मित्रांना महाविद्यालयांत बोलावून गोंधळ घालू नये. अन्यथा त्या विद्यार्थ्यावर कारवाई करण्यात येईल.

६. कुठल्याही तक्रारी संदर्भात विद्यार्थ्यांने पालकांव्यतिरीक्त इतर व्यक्तीला महाविद्यालयात आणू नये.

७. शासनाने रॅगींग संबंधी केलेल्या कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी.

८. महाविद्यालयातील वर्गात, ग्रंथालयात, प्रयोगशाळेत व महाविद्यालयाच्या आवारात इतर ठिकाणी महाविद्यालयाचे जे सामान, फर्निचर, ग्रंथ, वर्तमानपत्र, प्रयोगशाळेचे सामान, खेळाचे साहित्य ठेवलेले आहे. त्यांची हेतूपुरस्सर हानी किंवा दुरुपयोग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केली जाईल व त्याची संपूर्ण नुकसान भरपाई संबंधीत विद्यार्थ्यांकडून करण्यात येईल.

९. विद्यार्थ्यांची प्राध्यापकांशी व महाविद्यालयातील इतर कर्मचाऱ्यांशी आदरपूर्वक वर्तणूक असावी. विद्यार्थ्यांनी आपसातील संभाषणात व वर्तणुकीतही सभ्यता व सुसंस्कृतपणा जोपासावा.

## अंतर्गत तक्रार निवारण समिती

महाविद्यालयामध्ये विद्यार्थीनींच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व संगाबाअवि, अमरावती यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' गठीत करण्यात आली आहे. विद्यार्थीनींनी स्त्रीत्वाचा अवमान होत असल्याचे जाणवल्यास किंवा कुणी छेड काढत असल्याबाबतची तक्रार समिती प्रमुखांकडे प्रत्यक्ष करावी वा लेडीज कॉमनरुम मधील तक्रार पेटीत टाकावी. कुठल्याही परिस्थितीमध्ये महाविद्यालयाशी संबंधित नसलेल्या व्यक्तीकडे विद्यार्थीनीने तक्रार करु नये. या समितीमार्फत विद्यार्थीनींसाठी सबलीकरणाच्या अनुषंगाने कायदेविषयक, सुरक्षाविषयक, आरोग्यविषयक मार्गदर्शनपर व्याख्यान तसेच विविध कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

## गणवेश

वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी - विद्यार्थीनींनी महाविद्यालयात येताना वर्षभर गणवेशात येणे सक्तीचे आहे.

**विद्यार्थ्यांसाठी :** ऑक्सफर्ड ब्ल्यू (डार्क ब्ल्यू)रंगाची फूल पॅन्ट आणि लाईट ब्ल्यू (आकाशी) रंगाचा फूल शर्ट (पूर्ण बाह्यांचे)

**विद्यार्थीनींसाठी :** पूर्ण बाह्यांचा (टु थर्ड स्लीव्हस्)लाईट ब्ल्यू (आकाशी) रंगाचा कुर्ता आणि ऑक्सफर्ड ब्ल्यू (डार्क ब्ल्यू) रंगाचा सलवार (कुर्ता राऊंड नेक, मिडीयम कट आणि पंजाबी सुट असलेला) ओढणी (डार्क ब्ल्यू).

## महाविद्यालयीन तासिकांची वेळ

- वरिष्ठ महाविद्यालय सकाळी ८.०० ते दुपारी २.००
- कनिष्ठ महाविद्यालय सकाळी ११.३० ते सायं. ५.३५

## कार्यालयाची वेळ

- **सोमवार ते शनिवार - सकाळी १०.०० ते सायं. ५.००**

# शैक्षणिक नियमिका ( २०२३-२४ )

| अ.क्र. | सत्र/दीर्घ सुटी | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्र | शनिवार, दि. ०३ जुलै, २०२३ | मंगळवार, दि. ०७ नोव्हेंबर, २०२३ |
| २ | हिवाळी दीर्घ सुटी | बुधवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२३ | सोमवार, दि. २७ नोव्हेंबर २०२३ |
| ३ | द्वितीय सत्र | मंगळवार, दि. २८ नोव्हेंबर, २०२३ | शनिवार, दि. २७ एप्रिल, २०२४ |
| ४ | उन्हाळी दीर्घ सुटी | सोमवार, दि. २९ एप्रिल, २०२४ | सोमवार, दि. १० जून, २०२४ |

| शैक्षणिक सत्रातील सुट्या | | |
|---|---|---|
| अ.क्र. | सण | दिवस व दिनांक |
| १ | मोहरम | शनिवार, दि. २९ जुलै, २०२३ |
| २ | स्वातंत्र्य दिन | मंगळवार, दि. १५ ऑगस्ट, २०२३ |
| ३ | पारशी नववर्ष (शहेनशाही) | बुधवार, दि. १६ ऑगस्ट, २०२३ |
| ४ | रक्षाबंधन | बुधवार, दि. ३० ऑगस्ट, २०२३ |
| ५ | श्रीगणेश चतुर्थी | मंगळवार, दि. १९ सप्टेंबर, २०२३ |
| ६ | गौरीपूजन | शुक्रवार, दि. २२ सप्टेंबर, २०२३ |
| ७ | अनंत चतुर्दशी / ईद-ए-मिलाद | गुरुवार, दि. २८ सप्टेंबर, २०२३ |
| ८ | महात्मा गांधी जयंती | सोमवार, दि. ०२ ऑक्टोबर, २०२३ |
| ९ | दसरा | मंगळवार, दि. २४ ऑक्टोबर, २०२३ |
| १० | ख्रिसमस | सोमवार, दि. २५ डिसेंबर, २०२३ |
| ११ | प्रजासत्ताक दिन | शुक्रवार, दि. २६ जानेवारी, २०२४ |
| १२ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | सोमवार, दि. १९ फेब्रुवारी, २०२४ |
| १३ | महाशिवरात्री | शुक्रवार, दि. ०८ मार्च, २०२४ |
| १४ | होळी (दुसरा दिवस)/धुलीवंदन | सोमवार, दि. २५ मार्च, २०२४ |
| १५ | गुड फ्रायडे | शुक्रवार, दि. २९ मार्च, २०२४ |
| १६ | गुढीपाडवा | मंगळवार, दि. ०९ एप्रिल, २०२४ |
| १७ | रमझान ईद (ईद-उल-फितर) | गुरुवार, दि. ११ एप्रिल, २०२४ |
| १८ | श्रीराम नवमी | बुधवार, दि. १७ एप्रिल, २०२४ |

## ग्रंथालय

आपल्या महाविद्यालयात स्वतंत्र आणि प्रशस्त इमारतीत समृध्द ग्रंथालय आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यासाठी स्वतंत्र वाचन कक्ष, स्वयंपूर्ण अभ्यासिका आणि वेगळा 'ग्रंथ देवाण-घेवाण' कक्ष यांची व्यवस्था असलेले ग्रंथालय हे महाविद्यालयाचे वैभव आहे. ग्रंथपाल आणि ग्रंथालय परिचर असा ग्रंथालयाचा कर्मचारी वर्ग असून तो पुरेसा, प्रशिक्षित, अनुभवी आणि कर्तव्यतत्पर आहे.

## ग्रंथालयाचे नियम

१) महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना १७ ऑगस्ट, २०२३ पर्यंत ग्रंथालयाचे सभासदत्व देण्यात येईल. जे विद्यार्थी या मुदतीत सभासद होणार नाहीत त्यांना प्रत्येकी ५० रुपये दंड आकारण्यात येईल.

२) ग्रंथालयाचे सभासदत्व स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी ग्रंथपालांशी संपर्क साधून 'ग्रंथालय पासबुक' घ्यावे.

३) प्रत्येक विद्यार्थ्याला ग्रंथालयातून प्रत्येक वेळी दोन क्रमिक आणि एक पुरक अशी तीन पुस्तके वाचनासाठी मिळू शकतील. मात्र प्रत्येक वर्गातील काही निवडक, हुशार विद्यार्थ्याला आणखी दोन अतिरिक्त पुस्तके उपलब्ध करुन देण्यात येतील.

४) प्रत्येक विद्यार्थ्याने वाचनासाठी घेतलेले पुस्तक सात दिवसांच्या आत परत करावे. त्यानंतर ते परत करणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येक पुस्तकाला प्रतिदिन १ रु. दंड आकारल्या जाईल. हा दंड भरल्याशिवाय त्यांना दुसरी पुस्तके मिळणार नाहीत.

५) ग्रंथालयातून पुस्तकांची देवाण-घेवाण करताना पुस्तकाची नोंद आपल्या ग्रंथालयाच्या पासबुकमध्ये झालेली आहे अथवा नाही हे विद्यार्थ्यांनी प्रत्येकवेळी तपासून घ्यावे.

६) ग्रंथालयाचे पुस्तक हरवल्यास त्या ग्रंथाची दुप्पट किंमत किंवा त्या पुस्तकाची नवीन प्रत द्यावी लागेल. त्याशिवाय त्याला पुस्तक मिळणार नाही. तसेच ही सर्व रक्कम भरल्याशिवाय लायब्ररी क्लिअरन्स सर्टीफिकेट मिळणार नाही.

७) पुस्तकाच्या कोणत्याही पानावर शाईने किंवा पेन्सिलने खुणा (अंडरलाईन) करु नये, पुस्तकातील पाने फाडू नये. तसे करणाऱ्या विद्यार्थ्यांवर 'ग्रंथालय सल्लागार समिती' च्या निर्देशानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

८) ग्रंथ देवाण-घेवाण सोमवार ते शनिवार महाविद्यालयीन वेळेतच होईल. वाचनकक्ष याच वेळेत सुरू राहील.

९) ग्रंथालयात ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही. वाचनकक्षात पाठ्यपुस्तकाशिवाय संदर्भ पुस्तके, दैनिके, नियतकालिके व प्रश्नपत्रिका संच इत्यादी ओळखपत्रावर मिळतील.

ग्रंथालयातील साहित्य ग्रंथालयाबाहेर घेऊन जाता येणार नाही.

१०) ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांशी बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यास ग्रंथालयाच्या सवलती बंद केल्या जातील, तसेच त्यांना दंड आकारला जाईल अथवा प्रवेश रद्द केला जाईल.

११) ग्रंथालयाचे संपूर्ण संगणकीकरण झालेले आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी OPAC (Online Public Access Catalogue) व N-List चा उपयोग करावा.

१२) ग्रंथालयामध्ये इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा वापर करण्यापूर्वी ग्रंथपालांची परवानगी घेणे व रजिस्टरमध्ये नोंद करणे अनिवार्य आहे.

१३) ग्रंथालयात प्रवेश करताना ग्रंथालय नोंदवहीमध्ये प्रत्येकाने नोंद करणे आवश्यक आहे.

१४) विद्यार्थ्याच्या काही तक्रारी असतील तर ग्रंथपालांशी अथवा ग्रंथालय सल्लागार समितीशी संपर्क साधावा.

१५) महाविद्यालय सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी आपली चांगली पुस्तके ग्रंथालयाला 'सप्रेम भेट' म्हणून द्यावी, असे आवाहन 'ग्रंथालय सल्लागार समिती' च्या वतीने करण्यात येत आहे. ती पुस्तके 'ग्रंथदान' योजनेत स्वीकारली जातील.

१६) ग्रंथालयात प्रवेश करताना पादत्राणे ग्रंथालयाच्या प्रवेशद्वाराजवळील स्टँडवर ठेवावीत.

## राष्ट्रीय सेवा योजना ( National Service Scheme )

महाविद्यालयात NSS (रा.से.यो.) पथक कार्यरत असून **प्रा. डॉ. एम. एस. साळवे** हे कार्यक्रम अधिकारी आहेत व **प्रा. डॉ. ज्योती ढोकले** ह्या महिला कार्यक्रम अधिकारी आहेत. **प्रा.डॉ. रामेश्वर माने व प्रा.डॉ. रुपाली तेलगड** हे सहकार्यक्रम अधिकारी आहेत. रा.से.यो. विभागाच्या उल्लेखनीय कामगिरीचे फलीत म्हणून विद्यापीठाकडून रा.से.यो. पथकाची विद्यार्थी संख्या १५० वरून २०० अशी वाढविण्यात आली आहे. यामध्ये १०० विद्यार्थी व १०० विद्यार्थीनी अशी दोन स्वतंत्र पथके आहेत. फक्त पदवी वर्गामध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. रा.से.यो अंतर्गत वर्षभर नियमितपणे कार्यक्रम होतात, दत्तकग्रामी ७ दिवसांचे विशेष शिबिर आयोजित केले जाते. हे निवासी शिबिर असते. त्यात सातही दिवस विद्यार्थी आणि विद्यार्थीनी पूर्णवेळ सहभागी होतात. रा.से.यो. स्वयंसेवकांना विद्यापीठीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये आणि शिबिरांमध्ये तसेच दिल्ली किंवा मुंबई येथे गणराज्य दिन प्रसंगी होणाऱ्या संचलनात (आर.डी.परेडमध्ये) सहभागी होण्यासाठी संधी उपलब्ध असते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेत वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या स्वयंसेवकांची राज्यस्तरीय व विद्यापीठीय पातळीवर उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून निवड करुन त्यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यात येतो.

राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी कार्यक्रम अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## राष्ट्रीय कॅडेट कोर (National Cadet Corps)

महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय कॅडेट कोरचे एक स्वतंत्र पथक असून **प्रा.डॉ. महेश तांदळे** असोसिएट एनसीसी अधिकारी असून **प्रा.डॉ. गजानन तांबडे** हे एनसीसी केअरटेकर ऑफीसर आहेत. या पथकात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्या जातो. महाविद्यालयात ८५ कॅडेट्सचे एनसीसी पथक आहे. एन.सी.सी. द्वारे छात्रांना ॲन्यूअल ट्रेनिंग कॅम्प, थल सेना कॅम्प, रिपब्लिक डे कॅम्प यासह एनआयसी (National Integration Camp) असे विविध कॅम्प करण्याची संधी उपलब्ध होते. विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेमध्ये प्रोत्साहनपर जास्तीत जास्त १० गुण दिले जातात. गुणवत्ता, शरीरयष्टी आणि लष्करी शिक्षणाविषयीची अभियोग्यता या निकषांच्या आधारे एन.सी.सी. पथकामध्ये प्रवेश दिला जातो. या पथकांतर्गत वर्षभर विविध कार्यक्रम-उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते. एन.सी.सी. 'सी' सर्टिफिकेट उत्तीर्ण झालेल्या कॅडेटस्‌ना सैनिक भरतीमध्ये विशेष प्राधान्य दिले जाते.

## क्रीडा विभाग

महाविद्यालयामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे वरिष्ठ महाविद्यालयीन व कनिष्ठ महाविद्यालयीन असे दोन विभाग आहेत. महाविद्यालयाच्या इन्डोअर स्पोर्टस्‌ कॉम्प्लेक्समध्ये अत्याधुनिक साहित्यांनी युक्त जीम (व्यायामशाळा), बॅडमिंटन कोर्ट (Wooden flooring), कुस्तीच्या अद्यावत मॅट्रेसेस, चेस, कॅरम, योगासने अशा खेळांचे साहित्य व सुविधा उपलब्ध आहेत. आऊट डोअरमध्ये क्रिकेट, कबड्डी, खोखो, फुटबॉल, व्हॉलीबॉल तसेच गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, लांब उडी, उंच उडी अशा विविध खेळांच्या सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना विविध खेळांचे अद्यावत कौशल्य अवगत व्हावे यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या कार्यशाळेचे आयोजनही करण्यात येते.

दरवर्षी विविध खेळाचे संघ तयार करुन आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येते. विद्यार्थ्यांना क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक **डॉ. किरण मोगरकर** हे मार्गदर्शन करतात. प्रत्येक खेळाडूला त्याच्या प्रतिभेच्या बळावर कलर कोट जिंकण्याची संधी असते.

साधारणतः जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात प्रत्येक विद्यार्थ्याची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. या चाचणीस प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थीनीने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. या चाचणीस गैरहजर राहणाऱ्यांना प्रत्येकी २५ रु. दंड आकारण्यात येईल.

महाविद्यालय स्तरावर दरवर्षी विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी वैद्यकीय तपासणीचे आयोजन महाविद्यालयात करण्यात येते. साधारणतः जानेवारी महिन्यामध्ये वैद्यकीय तपासणी आयोजित केली जाते. महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक यांनी सूचित केलेल्या तारखेला महाविद्यालयामध्ये पुरुष डॉक्टर व महिला डॉक्टर उपस्थित असतात. त्या दिवशी वेळापत्रकानुसार सर्व विद्यार्थ्यांनी वैद्यकीय तपासणी करुन घेणे आनिवार्य आहे.

## स्पर्धा परीक्षा, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्त्व लक्षात यावे तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधीबाबत मार्गदर्शन करण्याासाठी महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामार्फत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाविषयक मार्गदर्शन करण्यासाठी तासिका घेतल्या जातात. या कक्षाद्वारे महाराष्ट्रातील युनिक अकादमी, पुणे, रिलायबल अकादमी, औरंगाबाद, बोर्डे अकादमी औरंगाबाद, भोगे अकादमी, औरंगाबाद, दीपस्तंभ अकादमी, जळगाव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे आयएएस पूर्व मार्गदर्शन केंद्र अशा नामवंत अकादमीच्या तज्ज्ञ संचालकांना तसेच प्रशासकीय उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना महाविद्यालयामध्ये मार्गदर्शनासाठी निमंत्रित केले जाते. या कक्षाद्वारे नोकरीच्या संधी, स्पर्धा परीक्षेची तयारी आणि मुलाखतीचे तंत्र या विषयी मार्गदर्शन केले जाते तसेच आर्मी भरतीपूर्व आणि पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान चाचणी परीक्षेचे व स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी सराव परीक्षांचे आयोजनही या कक्षाद्वारे केले जाते. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका / वाचन कक्ष उपलब्ध आहे. या कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचे ऑनलाईन फॉर्म भरुन देण्याची सुविधा पुरविली जाते. एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी., बँकींग, स्टाफ सिलेक्शन कमिशन व इतर स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून स्पर्धा परीक्षांविषयक संदर्भ ग्रंथ वाचनासाठी दिले जातात. विविध स्पर्धा परीक्षांविषयीची माहिती महाविद्यालयाच्या www.svcdraja.org या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिली जाते. व्हॉटसअॅप सारख्या प्रसार माध्यमांमार्फत विद्यार्थ्यापर्यंत स्पर्धा परीक्षेच्या जाहिराती पोहोचविल्या जातात.

औद्योगिक व इतर खाजगी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांशी संपर्क साधून महाविद्यालयामध्ये कॅम्पस इंटरव्हयूचे आयोजन केले जाते. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा यांच्या सहकार्याने रोजगार मेळावे आयोजित केले जातात. केवळ ज्ञानसंपादन न करता त्याचा कालोचित वापर करुन स्वयंरोजगार उपलब्ध करण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणांना या कक्षामार्फत मार्गदर्शन केले जाते. वेगवेगळे व्यवसाय सुरु करण्यासंदर्भात तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. **प्रा. डी.एम.शिंब्रे** हे या कक्षाचे समन्वयक आहेत. स्पर्धा परीक्षा, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्षामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधावा.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करीअर कट्टा अंतर्गत आय.ए.एस. आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत असलेल्या कोर्सची

यादी पाहण्यासाठी http://careerkatta.mitsc.co.in या लिंकवर भेट द्यावी. अधिक माहितीसाठी प्रा. डी. एम. शिंब्रे यांच्याशी संपर्क साधावा

## Career Katta

### (Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement, etc.)

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join :** Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees :** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs. 0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It including free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.

**How to Register :** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online payment mode

**College Code:** A 1116

**Contact:** For more details visit college webpage www.svcdraja.org or contact Coordinator Mr. D.M. Shimbre, Department of Zoology, 9545240802 or Career Katta Helpline 75076 52555

## सांस्कृतिक मंडळ

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नरत असते. अभिनय, गायन, वादन, नृत्य इ. सुप्त गुणांना वाव मिळावा व त्या माध्यमातून एखादा कलावंत नावारुपास यावा यासाठी हे मंडळ कार्यरत असते. महाविद्यालयीन, विद्यापीठ, राज्यस्तरीय स्पर्धा, युवक महोत्सव, विविध सांस्कृतिक स्पर्धा तसेच वार्षिक स्नेह संमेलन यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा व यश संपादन करावे, यासाठी या मंडळामार्फत प्रयत्न केले जातात. सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी महाविद्यालयामध्ये दोन अद्ययावत सभागृह आहेत.

## वाङ्मय मंडळ

विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयीन अभिरुची निर्माण व्हावी यासाठी मराठी व इंग्रजी वाङ्मय मंडळाकडून विविध उपक्रम राबविले जातात. वैचारिक, ललित, काव्य, कथा आदि वाङ्मय प्रकारांचा परिचय व्हावा यासाठी भित्तीपत्रक शिवाय निबंध लेखन, काव्य वाचन, कथा कथन इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते. विविध क्षेत्रातील ख्यातनाम कलावंत, साहित्यिक यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन या मंडळाद्वारे केले जाते.

## सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या विषयात प्रावीण्य प्राप्त करता यावे, त्या विषयाच्या ज्ञानाचे उपयोजन करता यावे यासाठी इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व भूगोल या सामाजिक शास्त्रांतर्गत येणाऱ्या विषयांची अभ्यास मंडळे स्थापन केली जातात. या अभ्यास मंडळाच्या वतीने वर्षभर विषयास पूरक असे विविध उपक्रम राबविले जातात.

## वाणिज्य अभ्यास मंडळ

या अभ्यास मंडळांतर्गत अभ्यास दौरा, प्रश्नमंजुषा, चर्चासत्र, अतिथी व्याख्यान, सर्वेक्षण प्रकल्प, वॉल मॅगझीन, यशस्वी उद्योजकांच्या मुलाखती, विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन व प्रेरणा दिली जाते.

## विज्ञान अभ्यास मंडळ

विज्ञान विद्याशाखेतील सर्व विषयांचे विज्ञान अभ्यास मंडळ स्थापन केले जाते. विद्यार्थ्यांच्या सहभागातून हे मंडळ विविध उपक्रम राबविते. वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन, जैवविविधता, विज्ञानाचे महत्त्व अशा अनेक घटकांवर हे अभ्यास मंडळ सातत्याने कार्य करीत असते.

## कमवा व शिका योजना

महाविद्यालयामध्ये गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक गरजा भागवता याव्या यासाठी 'कमवा व शिका योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे. याअंतर्गत विद्यार्थी सुविधा केंद्र, ग्रंथालय वा इतर महाविद्यालयीन कामकाजाच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांना मानधन दिले जाते.

## विद्यार्थी सुविधा केंद्र

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक साहित्य मिळविताना विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी विद्यार्थी सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना झेरॉक्स, लॅमिनेशन, पासपोर्ट फोटो, शालेय स्टेशनरी इत्यादी सुविधा नाममात्र दरात पुरविल्या जातात.

## विद्यार्थी सहाय्यता निधी

ह्या निधीतून गरजू विद्यार्थ्यांना पुस्तक खरेदी करिता व परीक्षा शुल्क भरण्याकरिता मदत केली जाते. ही मदत मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने उपस्थिती, अभ्यासातील प्रगती आणि एकूण वर्तणूक या बाबतीत दक्षता बाळगावयास हवी.

## महाविद्यालय वार्षिकांक 'स्पंदन'

महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी नियमितपणे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा व सकस अभिव्यक्तीचा परिचय करुन देणाऱ्या 'स्पंदन' वार्षिकांकाचे प्रकाशन केले जाते. विविध लेख, कविता, मुलाखत, चित्र, रेखाटने आदिंचा 'स्पंदन' मध्ये समावेश केला जातो. आपणही व्यक्त व्हावं, सर्जनाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावं या भावनेतून शब्दबध्द होऊ पाहणाऱ्या महाविद्यालयीन तरुण, टवटवीत अंकुरांना फुलविण्याचा बहारदार उपक्रम या वार्षिकांकाच्या माध्यमातून साध्य केला जातो. असंख्य कोवळया लेखण्यांना धीर यावा, बळ मिळावं व उद्याची लेखन परंपरा समृध्द करणाऱ्या पिढीमध्ये आत्मविश्वास दृढ व्हावा ही या व्यासपीठाची उपलब्धी आणि प्रकाशनामागचे प्रयोजन आहे. नवलेखक, नवकवींच्या लेखनशैलीचा विकास घडवून आणण्यासाठी तसेच त्यांच्या अंगी असलेल्या प्रतिभेला विकसित करण्यासाठी हा वार्षिकांक म्हणजे सुसंधी तद्वतच महाविद्यालयीन अंतरंगाची अभिव्यक्ती होय.

## युवा महोत्सव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा दरवर्षी आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या युवा महोत्सवामध्ये आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया प्रमाणात सहभागी होत असतात.

महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनींना त्यांच्या आवडीच्या कलाक्षेत्रामध्ये संधी उपलब्ध करुन देणे व त्यांच्या कलागुणांना वाव देणे हा यामागचा उद्देश असतो. युवा महोत्सवामध्ये खालील कलाप्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. संगीत :

शास्त्रीय गायन, शास्त्रीय वादन, सुगम संगीत, पाश्चिमात्य गायन, भारतीय समुहगान, पाश्चिमात्य समुहगान, लोक संगीत वाद्यवृंद.

२. नृत्य :

लोक / आदिवासी नृत्य, शास्त्रीय नृत्य.

३. साहित्यिक प्रकार :

प्रश्न मंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा (फक्त हिंदी/ इंग्रजी भाषेत).

४. रंग मंचीय कलाप्रकार :

एकांकीका, प्रहसन (Skit), मुकनाटय (Mime), नकला (Mimicry)

५. ललित कला :

स्थळचित्र (Spot Painting), चिकट कला (Collage), पोस्टर मेकिंग, माती कला (Clay Modeling), व्यंगचित्रे (Cartooning), रांगोळी व मेहंदी.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याद्वारे सुध्दा युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या युवा महोत्सवाचे आयोजन साधारणत: नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात करण्यात येते. या युवामहोत्सवाचे आयोजन जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर करण्यात येते. या युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी स्पर्धकाचे वय १५ ते २९ वर्षापर्यंत असावे.

## इंटरनेट सुविधा

महाविद्यालयामध्ये २० एम.बी.पी.एस. इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. कार्यालय, ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा विभाग, संगणक प्रयोगशाळा, स्टाफ रुममधील प्रत्येक विभागात इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसंदर्भातील माहितीसाठी स्पर्धा परीक्षा विभागात इंटरनेट सुविधेसह स्वतंत्र संगणक उपलब्ध करुन देण्यात आले असून विद्यार्थ्यांना याठिकाणी ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा पुरविली जाते. ग्रंथालयामध्येदेखील विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी इंटरनेट वापरासाठी स्वतंत्र संगणक उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

## डिजीटल क्लासरुम

महाविद्यालयामध्ये ज्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत त्यामध्ये डीजीटल क्लासरुम ही अध्ययन – अध्यापनासाठी पुरविली जाणारी अद्ययावत सुविधा आहे. टचस्क्रीन बोर्ड, इंटरनेट सुविधा इ.च्या माध्यमातून महाविद्यालयातील प्राध्यापक अध्यापनाचे कार्य करतात. यासाठी स्वतंत्र वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. अध्ययन – अध्यापनासोबतच व्हिडीओ कॉन्फरंसिंग वा इतर महत्त्वपूर्ण बाबींचा परिचय विद्यार्थ्यांना या माध्यमातून करुन दिला जातो.

## महाविद्यालयाचे संकेतस्थळ
## www.svcdraja.org

महाविद्यालयाचे अद्ययावत असे संकेतस्थळ कार्यान्वित असून **www.svcdraja.org** या वेब ॲड्रेसच्या आधारे विद्यार्थ्यांना संकेतस्थळास भेट देता येईल. महाविद्यालयात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडींसह, एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी., स्टाफ सिलेक्शन, बँकींग आदी स्पर्धा परीक्षांच्या जाहिराती, विद्यापीठ परीक्षांचे वेळापत्रक तसेच विद्यार्थ्यांसाठीच्या आवश्यक सर्व सूचना या संकेतस्थळावर अपलोड केल्या जातात. प्रवेशित विद्यार्थ्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाच्या संकेतस्थळास भेट देऊन माहिती अवगत करावी.

# महाविद्यालयीन परीक्षा

वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन्ही सत्रात मिळून एकूण ५ घटक चाचणी परीक्षा घेतल्या जातात. दिवाळीपूर्वी तीन व दिवाळीनंतर दोन युनिट टेस्टचे आयोजन केले जाते. इयत्ता १२ वी कला व वाणिज्यसाठी सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात प्रथम घटक चाचणी, दीपावली सुटीपूर्वी प्रथम सत्र परीक्षा घेण्यात येते. डिसेंबर व जानेवारी महिन्यामध्ये तीन सराव परीक्षा घेण्यात येतात. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात इयत्ता १२ वी बोर्डाची मौखिक परीक्षा तसेच साधारणतः फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बोर्डाची लेखी परीक्षा घेण्यात येते. इयत्ता ११ वी कला व वाणिज्यसाठी सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात प्रथम घटक चाचणी व दीपावली सुटीपूर्वी प्रथम सत्र परीक्षा घेण्यात येते. जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात द्वितीय घटक चाचणी घेण्यात येते. द्वितीय सत्र परीक्षा एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येते.

**या परीक्षांना गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**

# विद्यापीठ परीक्षेसंदर्भात सूचना

## नियमित विद्यार्थ्यांसाठी सूचना

१. महाविद्यालयाने निर्धारित केलेल्या तारखेच्या आत विद्यार्थ्याने आवश्यक फीसह ऑनलाईन परीक्षा फॉर्म अचूकपणे भरुन महाविद्यालयाच्या संबंधित लिपिकाकडे जमा करावा.

२. निर्धारित वेळेत ऑनलाईन फॉर्म भरुन न देणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठ नियमानुसार विलंब शुल्कासह नंतरच्या ठराविक मुदतीतच फॉर्म भरुन देता येईल.

३. ठराविक मुदतीत परीक्षा फॉर्म भरुन न देणारा विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानास संबंधित विद्यार्थीच जबाबदार असेल.यासाठी महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

४. विद्यार्थ्याच्या परीक्षा फॉर्ममध्ये त्रुटी असल्यास/अपूर्ण माहिती दिल्यास/आवश्यक कागदपत्रे किंवा गुणपत्रिका न जोडल्यास विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास किंवा विद्यापीठाकडून निकाल राखीव राहिल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानास संबंधित विद्यार्थी जबाबदार असेल.

५. विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी निवडलेले म्हणजेच प्रवेश अर्जावर लिहिलेले विषय ऑनलाईन परीक्षा फॉर्ममध्ये भरावे. ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरतेवेळी विषय बदलून लिहिल्यास विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास किंवा विद्यापीठाकडून परीक्षेचे हॉल टिकिट प्राप्त न झाल्यास किंवा निकाल राखीव राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची असेल. त्यास महाविद्यालय जबाबदार असणार नाही.

६. विद्यार्थ्याने संपूर्ण अचूक माहितीसह ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरुन द्यावा. परीक्षा फॉर्ममध्ये चुकीचे नाव लिहिलेले असेल तर गुणपत्रिकेवरसुध्दा तसेच चुकीचे नाव येऊ शकते. त्यात दुरुस्ती करण्यासाठी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या शुल्कासह महाविद्यालयाच्या परीक्षा समन्वयकाकडे/संबंधित लिपिकाकडे विनंती अर्ज करावा. विद्यापीठाने गुणपत्रिकेवरील नावात दुरुस्ती करुन दिल्यानंतर विद्यार्थ्यास ती प्राप्त होईल.

७. ऑनलाईन परीक्षा फॉर्म सोबत आवश्यक त्या गुणपत्रिकांच्या सत्यप्रती जोडाव्यात व फॉर्म महाविद्यालयातील संबंधित लिपीकाकडे जमा करावा.

८. बी.ए., बी. कॉम. व बी.एस्सी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण अभ्यास हा विषय अनिवार्य आहे. त्यात उत्तीर्ण झाल्याशिवाय तसेच उत्तीर्ण झाल्याच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत विद्यापीठास पाठविल्याशिवाय अंतिम वर्षाचा निकाल विद्यार्थ्यास प्राप्त होणार नाही.

९. परीक्षार्थ्याने परीक्षेच्या तारखेपूर्वी महाविद्यालयाच्या संबंधित लिपिकाकडून हॉल टिकिट प्राप्त करुन घ्यावे. हॉल टिकिटशिवाय परीक्षार्थ्यास परीक्षेस प्रवेश मिळणार नाही. विद्यापीठाकडून एखाद्या परीक्षार्थ्यास परीक्षेचे हॉल टिकिट प्राप्त न झाल्यास परीक्षा सुरू होण्याच्या आठ दिवसापूर्वी महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राधिकाऱ्याकडे/परीक्षा समन्वयकाशी संपर्क साधून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

१०. विद्यापीठाकडून परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर विद्यापीठाकडून महाविद्यालयास गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतरच परीक्षार्थ्यांना त्या प्राप्त होतील. परीक्षार्थ्यांना परीक्षेचा निकाल विद्यापीठाच्या वेबसाईटवर http://www.sgbau.ucanapply.com या वेबअॅड्रेसवर पाहता येईल.

११. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय व तृतिय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्याचा सत्र ४ व ६ चा निकाल विद्यापीठाकडून राखीव राहू नये यासाठी द्वितीय वर्षात सर्व विषयात पास असलेल्या विद्यार्थ्यांनी सत्र १ ते ३ च्या गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती व तृतीय वर्षात सर्व विषयात पास असलेल्या विद्यार्थ्यांनी सत्र १ ते ५ च्या गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती व पर्यावरण अभ्यास प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

१२. बी.ए. द्वितीय वर्षामध्ये प्रवेशित होण्यासाठी बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दोन्ही सत्राच्या १० विषयांपैकी कोणत्याही किमान ६ विषयात उत्तीर्ण होणे आवश्यक असते.

१३. बी.कॉम.द्वितीय वर्षामध्ये प्रवेशित होण्यासाठी बी.कॉम.प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दोन्ही सत्राच्या १२ विषयांपैकी कोणत्याही किमान ६ विषयात उत्तीर्ण होणे आवश्यक असते.

## निकाल राखीव राहिल्यास

१. विद्यापीठाकडून परीक्षार्थ्यांचा निकाल राखीव राहिल्यास त्यासंबंधीच्या त्रुटीची पूर्तता त्यास करावी लागेल. त्यासंबंधी आवश्यक ते मार्गदर्शन महाविद्यालयाचे परीक्षा समन्वयक करतील. त्यासाठी परीक्षार्थ्याने परीक्षा समन्वयकाकडे अर्ज करावा.

२. परीक्षार्थ्यांने त्रुटीची पूर्तता केली आहे, अशी विद्यापीठाची खात्री झाल्यास गुणपत्रिका प्राप्त होईल. विद्यापीठाकडून प्रक्रियेस विलंब झाल्यास / विद्यापीठाकडून गुणपत्रिका उशिरा मिळाल्यास किंवा प्राप्त न झाल्यास महाविद्यालय/महाविद्यालयाचे परीक्षा समन्वयक जबाबदार राहणार नाही.

## अनुत्तीर्ण/माजी विद्यार्थ्यांसाठी सूचना

१. परीक्षेचा निकाल लागल्याच्या तारखेपासून १० दिवसाच्या आत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने महाविद्यालयात ऑनलाईन परीक्षा फॉर्म फीसह अचूक भरुन संबंधित लिपिकाकडे जमा करावा.

२. निर्धारित वेळेत ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरुन न देणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठ नियमानुसार विलंब शुल्कासह विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मुदतीतच फॉर्म भरुन द्यावा लागेल.

३. निर्धारित मुदतीत ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरुन न देणारा विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची असेल.

४. प्रात्यक्षिक परीक्षा/लेखी परीक्षेमध्ये सूट मिळाली असल्यास किंवा फक्त प्रात्यक्षिक परीक्षेसाठीच परीक्षा फॉर्म भरला असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.

५. बी.ए. द्वितीय वर्ष/ बी. कॉम. द्वितीय वर्ष/बी.एस्सी. द्वितीय वर्ष चा विद्यार्थी पर्यावरण अभ्यास या विषयात अनुत्तीर्ण झाल्यास त्यास परीक्षा फॉर्म भरल्याशिवाय पुढील परीक्षेच्या वेळी पर्यावरण अभ्यास या विषयाचा पेपर देता येणार नाही.

## पुनर्मूल्यांकन करण्यासाठी सूचना

१. विद्यापीठ नियमानुसार पुनर्मूल्यांकन करण्यासाठी/उत्तरपत्रिकेची सत्यप्रत मागविण्यासाठी निकाल जाहीर झाल्यानंतर परीक्षार्थ्यांने स्वतः १५ दिवसाच्या आत www.sgbau.ac.in/ApplyOnline.asp या वेबअॅड्रेसवर ऑनलाईन अर्ज भरावा व विद्यापीठात रजिस्टर्ड किंवा स्पीड पोस्टाने किंवा स्वहस्ते सादर करावा. पुनर्मूल्यांकनाचा अर्ज विद्यार्थी स्वतः व स्वेच्छेने भरत असल्याने विद्यापीठाकडून पुनर्मूल्यांकन होऊन निकाल जाहीर होण्यास किंवा गुणपत्रिका पोस्टाने उशिरा मिळाल्यास/प्राप्त न झाल्यास महाविद्यालय किंवा महाविद्यालयाचे परीक्षा समन्वयक जबाबदार असणार नाही.

२. पुनर्मूल्यांकनाचा अर्ज भरताना काही अडचण असल्यास विद्यार्थ्याने परीक्षा समन्वयकाचे मार्गदर्शन घ्यावे.

## Migration प्राप्त करण्यासाठी सूचना

१. Migration Form महाविद्यालयाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रात तसेच विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in/migration-form-2014.pd या वेबअॅड्रेसवरही उपलब्ध आहे. विद्यार्थ्याने शुल्कासह संपूर्ण फॉर्म भरुन विद्यापीठात रजिस्टर्ड/स्पीड पोस्टाने किंवा स्वहस्ते सादर करावा. विद्यापीठाकडून Migration पोस्टाने उशिरा मिळाल्यास/प्राप्त न झाल्यास महाविद्यालय किंवा महाविद्यालयाचे परीक्षा समन्वयक जबाबदार असणार नाही.

२. Migration Form भरण्याबाबत काही अडचण असल्यास विद्यार्थ्याने परीक्षा समन्वयकाचे मार्गदर्शन घ्यावे.

## पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सूचना

१. पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अंतिम वर्षाच्या परीक्षा फॉर्मच्या फीसह पदवी प्रमाणपत्राची विद्यापीठाने निर्धारित केलेली फी भरावी लागेल. प्रमाणपत्रासाठीची फी न भरल्यास पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणार नाही.

२. पदवीची तीनही वर्ष उत्तीर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयामध्ये आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारोहामध्ये पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाईल. त्यासाठी प्राचार्यांकडे विनंती अर्ज करावा लागेल.

३. अर्जासोबत तृतीय वर्षाच्या गुणपत्रिकेची व आधार कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.

४. विद्यार्थ्याऐवजी वडील/आई यांना त्यांच्या पाल्याचे पदवी प्रमाणपत्र महाविद्यालयातून प्राप्त करावयाचे असल्यास संबंधित नावाचा उल्लेख असलेले अधिकारपत्र व विनंती अर्ज प्राचार्यांकडे सादर करावे. संबंधित नातेवाईकाने स्वतःच्या ओळखपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

**विशेष सूचना :-** परीक्षा फॉर्म भरण्यासंबंधीच्या तारखा, प्रात्यक्षिक परीक्षा व मौखिक परीक्षांच्या तारखांसंबंधीच्या सूचना व इतर सर्व प्रकारच्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व www.svcdraja.org या वेबसाईटवर प्रसिध्द केल्या जात असल्यामुळे परीक्षा फॉर्म भरणे, लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा व मौखिक परीक्षा यासंबंधी विद्यार्थ्यांशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार, ई-मेल, टेलिफोन, मोबाईलव्दारे महाविद्यालयाकडून संपर्क साधला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र

देऊळगाव राजा परिसरातील नोकरी करणाऱ्या तसेच जे विद्यार्थी नियमित शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या अभ्यासकेंद्रावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासकेंद्राच्या (१३७२-ए) अंतर्गत खालील अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना सर्वच क्षेत्रात करिअर करण्याची सुवर्ण संधी प्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | शिक्षणक्रम | कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| १ | बी.ए. (मराठी माध्यम) बी.कॉम. (मराठी / इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे (प्रवेश दरवर्षी जुलै-ऑगस्टमध्ये तसेच विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार) | मुक्त विद्यापीठाचा पूर्व तयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण किंवा १२ वी उत्तीर्ण किंवा १० वी नंतर सलग किमान दोन वर्षे कालावधीची कोणतीही शासनमान्य पदविका उत्तीर्ण. (शेतकी शाळा, आय.टी.आय.,पॉलीटेक्निक, ए.टी.डी., सी.टी.डी. इ.) |
| २ | एम.ए. मराठी व एम.ए. इंग्रजी | २ वर्षे (प्रवेश दरवर्षी जुलै-ऑगस्टमध्ये तसेच विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार) | संबंधित विषयासह पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| ३ | एम.एस्सी. गणित | २ वर्षे (प्रवेश दरवर्षी जुलै-ऑगस्टमध्ये तसेच विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार) | संबंधित विषयासह पदवी परीक्षा उत्तीर्ण |

**टीप :** माहिती पुस्तिका व प्रवेश अर्जासाठी प्रवेश कालावधीमध्ये केंद्र समन्वयक डॉ. यु.बी. देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.

*** केंद्र सहायक ***
**श्री. प्रकाश इंगळे**
मो.: ९७६७५६८४७३

*** केंद्र समन्वयक ***
**डॉ. यु.बी. देशमुख** (ग्रंथपाल)
मो.: ९८९०६७६२३०

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या

## प्रोत्साहनपर गुणांचा तपशील

राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, खेळ आणि क्रीडा, वक्तृत्त्व, नाट्य, संगीत, समाजसेवा इत्यादी पाठ्येत्तर कार्यक्रमासाठी सर्व शाखातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण देण्याची तरतूद अमरावती विद्यापीठाने केली आहे. मात्र विद्यार्थ्याला या विशेष गुण योजनेअंतर्गत जास्तीत जास्त दहापर्यंत प्रोत्साहनपर गुण देण्यात येतात. विद्यापीठ परीक्षेचा निकाल लावताना 'उत्तीर्णतेच्या सीमारेषेच्या खाली असलेल्या एका विषयात किंवा सर्व विषय मिळून जास्तीत जास्त पाच प्रतिशत गुणापर्यंत हे प्रोत्साहनपर गुण' मिळविले जातात. स्नातक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हे प्रोत्साहनपर गुण पुढीलप्रमाणे दिले जातील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अ) | संपूर्ण वर्षभर राष्ट्रीय छात्र सेनेतील सहभाग | – | ५ गुण |
| | ब) | बी सर्टिफिकेट परीक्षा उत्तीर्ण | – | २ गुण |
| | क) | सी सर्टिफिकेट परीक्षा उत्तीर्ण | – | २ गुण |
| | ड) | गणराज्य दिन संचलनासाठी निवड | – | ३ गुण |
| २. | अ) | संपूर्ण वर्षभर रा.से.यो. तील सहभाग | – | ५ गुण |
| | ब) | एका कॅम्पसह रा.से.यो. तील वर्षभराचा सहभाग | – | ६ गुण |
| | क) | दोन कॅम्पसह रा.से.यो. तील वर्षभराचा सहभाग | – | ७ गुण |
| ३. | अ) | विद्यापीठ स्तरावरील क्रीडास्पर्धा व सामने यातील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – | ३ गुण |
| | ब) | आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धा व सामने यातील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – | ५ गुण |
| ४. | अ) | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धांमधील सहभाग (वाद-विवाद, नाटक, संगीत : प्रत्येक स्पर्धेसाठी) | – | ३ गुण |
| | ब) | आंतरविद्यापीठ स्तरावरील वर नमूद केलेल्या सांस्कृतिक स्पर्धांमधील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – | ४ गुण |
| ५. | अ) | रक्तदान (प्रत्येक वेळेसाठी) | – | २ गुण |
| | ब) | कमाल गुण | – | ५ गुण |
| ६. | अ) | शासकीय योजनेअंतर्गत आवश्यक असणारी सांख्यिकीय माहिती संकलित करण्यामधील सहभाग | – | ५ गुण |
| ७. | अ) | गृहरक्षक दलातील सहभाग | – | ३ गुण |
| | ब) | गृहरक्षक दलातील कॅम्पसहित सहभाग | – | ५ गुण |

## * गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाणारी पारितोषिके *

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| १ | ▪ श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा<br>• राजे लखोजीराव जाधव स्मृती पारितोषिक<br>• राव जगदेवराव राजे जाधव स्मृती पारितोषिक | १) ५००१/- सुवर्णपदक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यास<br>२) १००१/- बी.ए.भाग १,२,३ सर्वाधिक गुण<br>३) १००१/- बी.कॉम.भाग १,२,३ सर्वाधिक गुण<br>४) १००१/- बी.एस्सी.भाग १,२,३ सर्वाधिक गुण<br>५) १००१/- इयत्ता १२ वी वाणिज्य मध्ये प्रथम<br>६) १००१/- इयत्ता १२ वी कला मध्ये प्रथम |
| २ | ▪ श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा<br>• राजे राजेंद्रसिंह जाधव स्मृती पारितोषिक<br>• राजे मानसिंगराव जाधव स्मृती पारितोषिक<br>• राजमाता कौसल्याबाई जाधव स्मृती पारितोषिक | १) ५०१/- बी.ए. भाग १ मध्ये सर्वाधिक गुण<br>२) ५०१/- बी.ए. भाग २ मध्ये सर्वाधिक गुण<br>३) ५०१/- बी.ए. भाग ३ मध्ये सर्वाधिक गुण<br>४) ५०१/- बी.कॉम. भाग १ मध्ये सर्वाधिक गुण<br>५) ५०१/- बी.कॉम. भाग २ मध्ये सर्वाधिक गुण<br>६) ५०१/- बी.कॉम. भाग ३ मध्ये सर्वाधिक गुण<br>७) ५०१/- बी.एस्सी.भाग १ मध्ये सर्वाधिक गुण<br>८) ५०१/- बी.एस्सी.भाग २ मध्ये सर्वाधिक गुण<br>९) ५०१/- बी.एस्सी.भाग ३ मध्ये सर्वाधिक गुण<br>१०) ५०१/- बी.ए.भाग १,२,३ मराठी विषयात सर्वाधिक गुण<br>११) ५०१/- बी.ए.भाग १,२,३ मराठी वाङ्मय विषयात सर्वाधिक गुण<br>१२) ५०१/- बी.कॉम.भाग १,२,३ मराठी विषयात सर्वाधिक गुण |
| ३ | ▪ प्राचार्य | १) ५००१/-सुवर्णपदक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यास |
| ४ | ▪ विषय शिक्षक | १) ५००१/-सुवर्णपदक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यास |
| ५ | ▪ प्रा. एम.बी.जाधव : स्व. बालासाहेब गुलाबराव जाधव स्मृती पारितोषिक | १) २५१/- बी.ए. भाग १ मराठी विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.ए. भाग २ मराठी विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.ए. भाग ३ मराठी विषयात प्रथम<br>४) २५१/- बी.ए. भाग १ मराठी वाङ्मय विषयात प्रथम<br>५) २५१/- बी.ए. भाग २ मराठी वाङ्मय विषयात प्रथम<br>६) २५१/- बी.ए. भाग ३ मराठी वाङ्मय विषयात प्रथम<br>७) २५१/- बी.कॉम. भाग १ मराठी विषयात प्रथम<br>८) २५१/- बी.कॉम. भाग २ मराठी विषयात प्रथम<br>९) २५१/- बी.कॉम. भाग ३ मराठी विषयात प्रथम<br>१०) २५१/- बी.एस्सी. भाग १ मराठी विषयात प्रथम |

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| ६ | ▪ **सौ. राजश्री सराफ-जिंतुरकर स्व. एस. के. जिंतुरकर स्मृती पारितोषिक** | १) १००१/- बी.कॉम. तृतीय वर्षामध्ये प्रथम<br>२) ५०१/- बी.कॉम. द्वितीय वर्षामध्ये प्रथम<br>३) ५०१/- बी.कॉम. प्रथम वर्षामध्ये प्रथम |
| ७ | ▪ **प्रा. पी.डी. मिनासे : स्व. सरस्वती दत्तात्रय मिनासे स्मृती पारितोषिक** | १) ७०१/- बी.ए. भाग २ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>२) ४०१/- बी.ए. भाग २ अर्थशास्त्र विषयात द्वितीय<br>३) ७०१/- बेस्ट एन.सी.सी. कॅडेट |
| ८ | ▪ **डॉ. व्ही.आर. बन्सिले : स्व. जमनादास बन्सिले स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.कॉम.भाग १, संगणक विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.कॉम.भाग २, संगणक विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.कॉम.भाग ३, संगणक विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.कॉम.भाग १,२,३ संगणक विषयात प्रथम<br>५) २५१/- बी.कॉम.भाग २, आयकर विषयात प्रथम<br>६) २५१/- एन.एस.एस. बेस्ट कॅडेट |
| ९ | ▪ **डॉ. एन.एच. शेगोकार : स्व. दत्तात्रय हरिभाऊ शेगोकार स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.कॉम. भाग १ अकाऊंट विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.कॉम.भाग २ अकाऊंट विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.कॉम.भाग २ अकाऊंट विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.कॉम. भाग १,२,३ अकाऊंट विषयात प्रथम<br>५) २५१/- बी.कॉम. भाग ३ पी.बी.एम. विषयात प्रथम |
| १० | ▪ **डॉ. ए.एम. आवटी : स्व. अंबादास आवटी स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.ए. भाग १ राज्यशास्त्र विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.ए. भाग २ राज्यशास्त्र विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.ए. भाग ३ राज्यशास्त्र विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.ए. भाग १,२,३ मध्ये राज्यशास्त्र विषयात प्रथम<br>५) २५१/- एन.सी.सी. बेस्ट कॅडेट |
| ११ | ▪ **प्रा. एस.बी. जगताप स्व. भास्करराव जगताप स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.कॉम.भाग १ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.कॉम.भाग २ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.कॉम.भाग ३ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.कॉम. भाग १,२,३ मध्ये अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>५) २५१/- बी.कॉम. भाग ३ मध्ये बी.आर.एफ. विषयात प्रथम |

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| १२ | ▪ **डॉ. सुधीर दयाराम चव्हाण :**<br>**स्व. सुमनबाई दयाराम चव्हाण**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.ए. भाग १,इंग्रजी विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.ए. भाग २,इंग्रजी विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.ए. भाग ३,इंग्रजी विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.ए. भाग १,२,३ मध्ये इंग्रजी विषयात प्रथम |
| १३ | ▪ **डॉ.आर.एच. देवरे**<br>**स्व. मथुराबाई हिरासिंग देवरे**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.ए. भाग १,इतिहास विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.ए. भाग २,इतिहास विषयात प्रथम<br>३)२५१/- बी.ए. भाग ३,इतिहास विषयात प्रथम<br>४)५०१/- बी.ए. भाग १,२,३ मध्ये इतिहास विषयात प्रथम |
| १४ | ▪ **डॉ. डी.व्ही. गोरे :**<br>**स्व. प्रल्हादराव पाटील गोरे**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.ए. भाग १ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.ए. भाग २ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.ए. भाग ३ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.ए. भाग १,२,३ मध्ये अर्थशास्त्र विषयात प्रथम |
| १५ | ▪ **डॉ. ई.बी. भालेराव :**<br>**राजे लखुजीराव जाधव व**<br>**राजे मालोजीराव भोसले**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.कॉम. भाग १ इंग्रजी विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.कॉम. भाग २ इंग्रजी विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.कॉम. भाग ३ इंग्रजी विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.कॉम. भाग १,२,३ मध्ये इंग्रजी विषयात प्रथम |
| १६ | ▪ **प्रा. ए. डी. कानवटे :**<br>**स्व. कलुबाई श्रीपती कानवटे**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.एस्सी. भाग १ भौतिकशास्त्र विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.एस्सी. भाग २ भौतिकशास्त्र विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.एस्सी. भाग २ भौतिकशास्त्र विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.एस्सी. भाग १,२,३ भौतिकशास्त्र विषयात प्रथम |
| १७ | ▪ **प्रा. एस.जे. चव्हाण :**<br>**स्व. जगदेवराव चव्हाण**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/- बी.एस्सी. भाग १ गणित विषयात प्रथम<br>२) २५१/- बी.एस्सी. भाग २ गणित विषयात प्रथम<br>३) २५१/- बी.एस्सी. भाग ३ गणित विषयात प्रथम<br>४) ५०१/- बी.एस्सी. भाग १,२,३ गणित विषयात प्रथम |

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| १८ | ▪ **प्रा. डॉ. आर. एल. तेलगड** | १) २५१/– बी.एस्सी.भाग १ संगणकशास्त्र विषयात प्रथम<br>२) २५१/– बी.एस्सी.भाग २ संगणकशास्त्र विषयात प्रथम<br>३) २५१/– बी.एस्सी.भाग ३ संगणकशास्त्र विषयात प्रथम<br>४) ५०१/– बी.एस्सी. भाग १,२,३ संगणकशास्त्र विषयात प्रथम |
| १९ | ▪ **प्रा. डॉ. ज्योती ढोकले : स्व. ज्ञानेश्वर विठ्ठल ढोकले ( देशमुख ) स्मृती पारितोषिक** | १) २५१/– बी.ए. भाग १ इंग्रजी वाङ्मय विषयात प्रथम<br>२) २५१/– बी.ए. भाग २ इंग्रजी वाङ्मय विषयात प्रथम<br>३) २५१/– बी.ए. भाग ३ इंग्रजी वाङ्मय विषयात प्रथम<br>४) ५०१/– बी.ए. भाग १,२,३ मध्ये इंग्रजी वाङ्मय विषयात प्रथम |
| २० | ▪ **प्रा. पी.बी. आढाव** | १) २५१/– बी.ए. भाग १, भूगोल विषयात प्रथम<br>२) २५१/– बी.ए. भाग २, भूगोल विषयात प्रथम<br>३) २५१/– बी.ए. भाग ३, भूगोल विषयात प्रथम<br>४) ५०१/– बी.ए. भाग १,२,३ भूगोल विषयात प्रथम |
| २१ | ▪ **प्रा.सौ. मंजुषा मुळे** | १) २५१/– १२ वी कला इंग्रजी विषयात प्रथम<br>२) २५१/– १२ वी वाणिज्य इंग्रजी विषयात प्रथम<br>३) २५१/– १२ वी कला मराठी विषयात प्रथम<br>४) २५१/– १२ वी वाणिज्य मराठी विषयात प्रथम |
| २२ | ▪ **प्रा. ए.के. राठोड** | १) २५१/– १२ वी कला सहकार विषयात प्रथम<br>२) २५१/– १२ वी कला अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>३) २५१/– १२ वी वाणिज्य सहकार विषयात प्रथम<br>४) २५१/– १२ वी वाणिज्य अर्थशास्त्र विषयात प्रथम |
| २३ | ▪ **डॉ. के.एस. कुळे** (माजी प्राचार्य) **स्व. सीतारामजी कुळे स्मृती पारितोषिक** | १)५०१/– बी.कॉम. भाग १,२,३ मध्ये प्रथम<br>२)५०१/– इयत्ता १२ वी वाणिज्य मधून अकाऊंट विषयात प्रथम |
| २४ | ▪ **श्री. गजानन मुळे : स्व. वसंतराव मुळे स्मृती पारितोषिक** | १)५०१/– बी.ए. भाग १,२,३ मध्ये सर्वाधिक गुण<br>२)५०१/– बी.ए. भाग २ मध्ये इंग्रजी वाङ्मय विषयात प्रथम |

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| २५ | ▪ **डॉ. के.व्ही. मोगरकर :**<br>**स्व. ज्योती बीडकर**<br>**स्मृती पारितोषिक** | १) ५०१/– वरिष्ठ महाविद्यालयातून कलरकोट प्राप्त खेळाडू<br>२) ५०१/– वरिष्ठ महाविद्यालयातून विद्यापीठ उपविजेता खेळाडू |
| २६ | ▪ **प्रा. एम.एल. जोशी**<br>**स्व.लक्ष्मीकांत जोशी स्मृती पारितोषिक** | १) ५०१/– १२ वी लेखाकर्म विषयात प्रथम<br>२) ५०१/– १२ वी व्यापार संघटन मध्ये प्रथम |
| २७ | ▪ **डॉ. यु.बी. देशमुख :**<br>**स्व. हसनराव देशमुख**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/– बेस्ट लायब्ररी युजर (मुले)<br>१) २५१/– बेस्ट लायब्ररी युजर (मुली) |
| २८ | ▪ **प्रा. बी.यु. काळे :**<br>**स्व. आप्पासाहेब काळे**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/– बी.एस्सी.भाग १ रसायनशास्त्र विषयात प्रथम<br>२) २५१/– बी.एस्सी.भाग २ रसायनशास्त्र विषयात प्रथम |
| २९ | ▪ **प्रा. एस.टी. पवार** | १) २५१/– १२ वी इतिहास विषयात प्रथम<br>२) २५१/– १२ वी राज्यशास्त्र विषयात प्रथम |
| ३० | ▪ **श्री.भूषण पन्हाळे :**<br>**स्व. शंकर पन्हाळे**<br>**स्मृती पारितोषिक** | १) २५१/–बी.कॉम.भाग २ बी.एम.एस.विषयात प्रथम<br>२) २५१/– बी.कॉम. भाग १,२,३ मध्ये अकाऊंट विषयात प्रथम |
| ३१ | ▪ **प्रा. पी. एम. कदम**<br>**स्व. माणिकराव कदम**<br>**स्मृती पारितोषिक** | १)५०१/– बी.एस्सी.भाग १,२,३ रसायनशास्त्र विषयात प्रथम |
| ३२ | ▪ **प्रा. एन. पी. काकडे** | १)५०१/– बी.एस्सी.भाग १,२,३ वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम |
| ३३ | ▪ **प्रा. डी.एम. शिंब्रे :**<br>**स्व. लक्ष्मीबाई हरिभाऊ शिंब्रे**<br>**स्मृती पारितोषिक** | १) ५०१/– बी.एस्सी. भाग १,२,३ प्राणीशास्त्र विषयात प्रथम |
| ३४ | ▪ **प्रा. पी.बी. पवार :** | १) ५०१/– बी.एस्सी. भाग १,२,३ सुक्ष्मजीवशास्त्र विषयात प्रथम |
| ३५ | ▪ **श्री. महेश मुळे :**<br>**स्व. वसंतराव मुळे स्मृती**<br>**पारितोषिक** | १)५०१/– बी.ए. भाग ३ मध्ये इंग्रजी वाङ्मय विषयात प्रथम |

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| ३६ | ▪ **श्री. बी.जी. वाजपे :<br>स्व. जी.डी. वाजपे<br>स्मृती पारितोषिक** | १) १५१/– बी.ए. भाग ३ मराठी विषयात प्रथम<br>२) १५१/– बी.ए. भाग १,२,३ मध्ये इंग्रजी अनिवार्य विषयात प्रथम<br>३) १५१/– इयत्ता १२ वी वाणिज्य मध्ये प्रथम |
| ३७ | ▪ **श्री. बी.बी. झिने** | १) १०१/–इयत्ता १२ वी, राज्यशास्त्र विषयात प्रथम<br>२) १०१/– इयत्ता १२ वी,इतिहास विषयात प्रथम<br>३) १०१/– इयत्ता १२ वी कला व वाणिज्य मध्ये इंग्रजी विषयात प्रथम |
| ३८ | ▪ **सौ.एस.व्ही. रोडगे :<br>स्व. कु. विद्या मेश्राम<br>स्मृती पारितोषिक** | १) १०१/–बी.कॉम. भाग ३ मुलींमध्ये प्रथम<br>२) १०१/–बी.ए.भाग ३ मुलींमध्ये प्रथम<br>३) १०१/–बी.एस्सी.भाग ३ मुलींमध्ये प्रथम |
| ३९ | ▪ **श्री. श्रीपाद टोणपे :<br>स्व. मधुकर टोणपे<br>स्मृती पारितोषिक** | १)१०१/– बी.एस्सी. भाग १ मध्ये प्रथम<br>२)१०१/– बी.एस्सी. भाग २ मध्ये प्रथम<br>३)१०१/– बी.एस्सी. भाग ३ मध्ये प्रथम |
| ४० | ▪ **श्री. प्रवीण बन्सिले :<br>स्व. मिनाक्षीबाई बन्सिले<br>स्मृती पारितोषिक** | १) १५१/– बी.ए. भाग ३ अर्थशास्त्र विषयात प्रथम<br>२) १०१/– बी.ए. भाग ३ मध्ये अर्थशास्त्र विषयात द्वितीय |
| ४१ | ▪ **प्रा. डॉ. डी.आर. बिन्हाडे** | १) २५१/– बी.एस्सी.भाग ३ रसायनशास्त्र विषयात प्रथम |
| ४२ | ▪ **प्रा. डॉ. जी.एम. तांबडे** | १) २५१/– बी.एस्सी.भाग १ वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम |
| ४३ | ▪ **प्रा. डॉ. आर.वाय. माने<br>स्व. यशवंतराव माने<br>स्मृती पारितोषिक** | १) २५१/– बी.एस्सी.भाग २ वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम |
| ४४ | ▪ **प्रा. डॉ. एम.एस. साळवे** | १) २५१/– बी.एस्सी.भाग ३ वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम |
| ४५ | ▪ **प्रा. डॉ. आर. आर. खवल** | १) २५१/– बी.एस्सी. भाग १ प्राणीशास्त्र विषयात प्रथम |
| ४६ | ▪ **प्रा. आर.डी. सरोज** | १) २५१/– बी.एस्सी. भाग २ प्राणीशास्त्र विषयात प्रथम |
| ४७ | ▪ **प्रा. डॉ. एम.आर. तांदळे** | १) २५१/– बी.एस्सी. भाग ३ प्राणीशास्त्र विषयात प्रथम |

| अ.क्र. | प्रायोजकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| ४८ | ▪ प्रा. डॉ. ए. एस. जाधव | १) २५१/- बी.एस्सी. भाग १ सुक्ष्मजीवशास्त्र विषयात प्रथम |
| ४९ | ▪ प्रा. जी. जी. ढगे | १) २५१/- बी.एस्सी. भाग २ सुक्ष्मजीवशास्त्र विषयात प्रथम |
| ५० | ▪ प्रा. आर.एन. गणबास | १) २५१/- बी.एस्सी. भाग ३ सुक्ष्मजीवशास्त्र विषयात प्रथम |
| ५१ | ▪ श्री. डी.बी. सावरकर : स्व. बाबुरावजी सावरकर स्मृती पारितोषिक | १) १०१/- ग्रंथालयातील नियमित वाचक (वरिष्ठ महाविद्यालय)<br>२) १०१/- ग्रंथालयातील नियमित वाचक (कनिष्ठ महाविद्यालय) |
| ५२ | ▪ डॉ. वाय. के. आठवे : स्व. रामभाऊ गिरजाप्पा आठवे स्मृती पारितोषिक | १) १०१/- बी.कॉम.भाग ३ ई.ओ.ई.विषयात प्रथम<br>१) १०१/- बी.कॉम.भाग २ आय.टी.बी. विषयात प्रथम |
| ५३ | ▪ श्री.एस.जी. कुळकर्णी | १) १५१/- इयत्ता १२ वी अकाऊंट विषयात प्रथम |
| ५४ | ▪ श्री. आर.एस. जाधव : | १) १५१/- महाविद्यालयीन शिस्तीचे पालन व विविध उपक्रमात उत्कृष्ट सहभाग |
| ५५ | ▪ श्री. एम.एम. चव्हाण : स्व. मुकुंदराव चव्हाण स्मृती पारितोषिक | १) १०१/- बी.ए.भाग ३ मध्ये प्रथम |

गुणवंत विद्यार्थ्यांसाठीची ही सर्व पारितोषिके महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील दानशूर व्यक्ती यांच्या उदार अंत:करणातून दिलेल्या रकमेतून दिली जातात. गुणवंतांचे कौतुक व्हावे, त्यांचा सन्मान व्हावा व शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांनी सतत भरघोस यश मिळवावे हा उदात्त हेतू या दातृत्वामागे आहे.

# गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण

महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा आजतागायत जोपासली आहे. महाविद्यालयाच्या या प्रयत्नांना विद्यार्थ्यांनीदेखील समाजामध्ये विविध क्षेत्रात नोकरी मिळवून अपेक्षित प्रतिसाद दिला आहे. विविध विषयांमध्ये / वर्गामध्ये प्रथम, द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला उभारी मिळावी यासाठी महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषिक वितरण समारोहाचे आयोजन केले जाते.

**या उपक्रमांची ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे -** १) या उपक्रमाचे नियमित आयोजन केले जाते. २) महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी तसेच शहरातील उदार दात्यांकडून रक्कम संकलित केली जाते. ३) विशिष्ट वर्गामध्ये / विषयामध्ये प्रथम, द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक दिले जाते. ४) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेत विशिष्ट विषयामध्ये सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यास श्री बालाजी संस्थानकडून रोख रु. ५००१/-, प्राचार्य यांच्याकडून रोख रु. ५००१/- व विषय शिक्षकाकडून रोख रु. ५००१/- अशी रक्कम देऊन सन्मानित करण्यात येते. ५) गुणवंत विद्यार्थी सत्कार व पारितोषिक वितरण समारोहासाठी समाजातील शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, साहित्य वा इतर क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित केले जाते. अतिथींच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो.

**शैक्षणिक सत्र २००८-०९ ते २०२१-२२ दरम्यान रोख पारितोषिकांची तपशीलवार माहिती :**

| अ.क्र. | शैक्षणिक सत्र | पारितोषिकाची रक्कम |
|---|---|---|
| १ | २००८-२००९ | ११,७५०/- |
| २ | २००९-२०१० | १६,११०/- |
| ३ | २०१०-२०११ | १९,८००/- |
| ४ | २०११-२०१२ | १८,५७३/- |
| ५ | २०१२-२०१३ | २५,४७१/- |
| ६ | २०१३-२०१४ | २३,८७९/- |
| ७ | २०१४-२०१५ | २४,०७७/- |
| ८ | २०१५-२०१६ | २९,७९३/- |
| ९ | २०१६-२०१७ | ३०,००६/- |
| १० | २०१७-२०१८ | ४९,५१३/- |
| ११ | २०१८-२०१९ | ४४,३८०/- |
| १२ | २०१९-२०२० | ४६,३७३/- |
| १३ | २०२०-२०२१ | ६५,३५३/- |
| १४ | २०२१-२०२२ | ६५,३५३/- |
| | | **एकूण रक्कम - ४,७०,४३१/-** |

या उपक्रमाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण झाली असून त्यांच्या अभ्यासू वृत्तीतही लक्षणीय सुधारणा झाली आहे.

## * वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद *

| | | |
|---|---|---|
| १) प्रा. डॉ. डी. व्ही. गोरे | प्राचार्य | एम.ए., एम.फिल., सेट, नेट, पीएच.डी. |
| २) प्रा. डॉ. एन. एच. शेगोकार | वाणिज्य विभाग | एम.कॉम., एम.फिल., बी.एड., पीएच.डी. |
| ३) प्रा. डॉ. एस. डी. चव्हाण | इंग्रजी विभाग | एम.ए., पीएच.डी., सेट, बी.एड. |
| ४) प्रा. डॉ. आर. एच. देवरे | इतिहास विभाग | एम.ए., एम.फिल., सेट, नेट, पीएच.डी. |
| ५) प्रा. डॉ. ए. एम. आवटी | राज्यशास्त्र विभाग | एम.ए.(राज्य.,इति.),एम.फिल.,बी.एड.,सेट,पीएच.डी. |
| ६) प्रा. डॉ. एस. बी. जगताप | वाणिज्य विभाग | एम.कॉम, एम.फिल.,पीएच.डी. |
| ७) प्रा. डॉ. व्ही. आर. बन्सीले | वाणिज्य विभाग | एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी. |
| ८) प्रा. डॉ. यु. बी. देशमुख | ग्रंथालय विभाग | एम.ए., एम.लीब., एम.फिल., पीएच.डी. |
| ९) प्रा. एम. बी. जाधव | मराठी विभाग | एम. ए., बी.एड., नेट |
| १०) प्रा. डॉ. ई. बी. भालेराव | इंग्रजी विभाग | एम. ए., एम.फिल., पीएच.डी. |
| ११) प्रा. डॉ. के. व्ही. मोगरकर | शा.शि.विभाग | एम.पी.एड, एम.फिल.,पीएच.डी. |
| १२) प्रा. बी. यु. काळे | रसायनशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, गेट |
| १३) प्रा. पी. एम. कदम | रसायनशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट |
| १४) प्रा. एन. पी. काकडे | वनस्पतीशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट |
| १५) प्रा. डॉ. ए. डी. कानवटे | भौतिकशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, पीएच.डी. |
| १६) प्रा. डी. एम. शिंब्रे | प्राणीशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट |
| १७) प्रा. डॉ. पी. बी. पवार | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | एम.एस्सी., सेट, नेट, पीएच.डी. |
| १८) प्रा. एस. जे. चव्हाण | गणित विभाग | एम.एस्सी., नेट |
| १९) प्रा. डॉ. आर. एल. तेलगड | संगणकशास्त्र विभाग | एम.एस्सी., एम.फील., पीएच.डी. |
| २०) प्रा. डॉ. जे.डी. ढोकले | इंग्रजी विभाग | एम.ए., पीएच.डी.(इंग्रजी), सेट (शि.शास्त्र) |
| २१) प्रा. डॉ. आर. आर. खवल | प्राणीशास्त्र विभाग | एम.एस्सी., पीएच.डी. |
| २२) प्रा. डॉ. ए. एस. जाधव | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | एम.एस्सी., पीएच.डी. |
| २३) प्रा. डॉ. एम. आर. तांदळे | प्राणीशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, सेट, पीएच.डी., बी.एड. |
| २४) प्रा. डॉ. एम. एस. साळवे | वनस्पतीशास्त्र विभाग | एम.एस्सी., पीएच.डी. |
| २५) प्रा. डॉ. जी. एम. तांबडे | वनस्पतीशास्त्र विभाग | एम.एस्सी., पीएच.डी. |
| २६) प्रा. डॉ. आर. वाय. माने | वनस्पतीशास्त्र विभाग | एम.एस्सी., पीएच.डी. |
| २७) प्रा. डॉ. डी.आर. बिऱ्हाडे | रसायनशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, पीएच.डी. |
| २८) प्रा. जी. जी. ढगे | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, सेट |
| २९) प्रा. आर. एन. गनबास | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, सेट |
| ३०) प्रा. आर. डी. सरोज | प्राणीशास्त्र विभाग | एम.एस्सी., नेट, गेट, सेट |

## * कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद *

| | | |
|---|---|---|
| १) प्रा. एम. एल. जोशी | वाणिज्य विभाग | एम.कॉम., बी.एड. |
| २) प्रा. कु. एम. व्ही. औटी | इंग्रजी, मराठी | एम.ए., बी.एड. |
| ३) प्रा. एस. टी. पवार | इतिहास, राज्यशास्त्र | एम.ए., बी.एड. |
| ४) प्रा. ए. के. राठोड | अर्थशास्त्र, सहकार | एम.ए., बी.एड. |

## * महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वृंद *

| | |
|---|---|
| १) सौ. एस. व्ही. रोडगे | अधीक्षक |
| २) श्री. के. डी. सोनोने | मुख्य लिपीक |
| ३) श्री. पी. ए. इंगळे | वरिष्ठ लिपीक |
| ४) श्री. एम. आर. जगदाळे | प्रयोगशाळा सहायक |
| ५) श्री. एस.बी. पानखडे | प्रयोगशाळा परिचर |
| ६) श्री. एस. पी. कापसे | प्रयोगशाळा परिचर |
| ७) श्री. ए. जी. लठाड | प्रयोगशाळा परिचर |
| ८) श्री. एस. व्ही. जायभाये | प्रयोगशाळा परिचर |
| ९) श्री. व्ही. ए. मदने | प्रयोगशाळा परिचर |
| १०) श्री. जी. डी. लठाड | सेवक |
| ११) श्री. ए. जी. पाखरे | सेवक |
| १२) श्रीमती एम.एच. भोसले | सेवक |

## * महाविद्यालयास मिळालेले विविध पुरस्कार *

**2013, 2014**
**जागर जाणिवांचा अभियान पुरस्कार**

**2015, 2016, 2017, 2018, 2019**
**स्वच्छ भारत अभियान पुरस्कार**

**2017**
**पर्यावरण पुरस्कार**

**2017**
**उत्कृष्ट एन.एस.एस. एकक पुरस्कार**

**2019**
**छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार**

## * अभिनंदनाचे मानकरी *

### १२ वी वाणिज्य



**कु. मोहिनी दिलीप महाजन**
(७४.५०% गुणांसह प्रथम)





**सारंग गिरीश पुजारी**
(७४.१७% गुणांसह द्वितीय)



**वैभव विजय मघाडे**
(७१.५०% गुणांसह तृतीय)

### १२ वी कला



**कु. स्नेहा भास्कर पाखरे**
(६७.००% गुणांसह प्रथम)





**मंगेश एकनाथ शिंदे**
(६५.००% गुणांसह द्वितीय)



**चेतन गजानन बुरकूल**
(६४.००% गुणांसह तृतिय)

# विद्यापीठ गीत

विद्या चिंतन । विद्या मंथन
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ।।

कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।।१।। जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे, लुळे, पांगळे
कर्मयोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओलाव्याने, मानस मोहरले ।।२।। जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवनदर्शन विश्वात्मक झाले ।।३।।
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।।




महाविद्यालयातील तासिका कक्ष




मैदानी खेळांची सुविधा



क्रीडासंकुलातील व्यायामशाळा



ग्रंथालयातील ग्रंथ देवाण-घेवाण कक्ष



ग्रंथालयातील ग्रंथसंपदा



ग्रंथालयातील विद्यार्थ्यांसाठीचा वाचन कक्ष



छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, मा. आरोग्यमंत्री ना. डॉ. तानाजी सावंत, मा. पर्यटन मंत्री ना. मंगलप्रभात लोढा व इतर मान्यवरांसोबत उपस्थित राजे लखुजीराव जाधव यांचे सिंदखेड राजा व देऊळगाव राजा शाखेचे वंशज, श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. राजे विजयसिंह जाधव



प्रजासत्ताक दिनानिमित्त 'बेस्ट एनसीसी कॅडेट' कु. प्रतिक्षा खांडेभराड हिचे अभिनंदन करताना राणीसाहेब सौ. छायाराजे विजयसिंह जाधव व उपस्थित श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. राजे विजयसिंह जाधव, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे




ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर यांच्या वतीने
८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनिस यांच्या हस्ते
व सुप्रसिध्द कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर, चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर, संत साहित्याच्या
अभ्यासक डॉ. वंदना मुरकुटे यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन,
साहित्यसेवा कार्यगौरव पुरस्कार स्वीकारताना महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव



**प्रकाशक : प्राचार्य, श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगाव राजा, जि. बुलडाणा - ४४३२०४**